Regd NO N. 150

# वऱ्हाडसमाचार.

**Berar Samachar**

वर्ष ४९ ] आकोला—सोमवार तारीख ५ माहे एप्रील सन १९१५ ई० [ अंक १३

## वर्गणीचे दर

आकोल्यांतील लोकांस........१ रुपया
बाहेरगांवी ट हा. ........ २ रुपये
वर्गणी आगाऊच घेण्याची वहिवाट आहे.

## नोटीशीचे दर

दर ओळीस दीड आणा.
हेडिंगच्या दोन ओळी धरल्या जातील
नोटीस सुवाच्य असली पाहिजे.

सूचनाः- गुरुवारच्या आंत येणाऱ्या नोटीसा त्याच आठवड्यांत घेतल्या जातील. मागुतें येणाऱ्या नोटीसास स्पेशल चार्ज पडेल.


### जाहिरात

मुंबई. ब्यांकेची सेव्हिंग ब्यांक.

ह्या बँकेंत खाली दिलेल्या अटीवर ठेवी ठेवितां येतात.

कोणत्याही वर्षाचे १ ले जानेवारी आणि ३१ दिसेंबर याच्या दरम्यान एक हजार रुपये पर्यंत पैसा ठेविला जाईल.

ठेवी दोन अथवा अधिक इसमांच्या नांवावर ठेवतां येतील आणि तो पैसा यापैकीं एकास अथवा जास्त इसमांस अगर यापैकीं मयताचे मागें सहील त्यांस काढतां येईल

व्याज दर साल दर शेंकडा तीन रुपयाप्रमाणें दिलें जाईल. व्याजाची आकारणी प्रत्येक महिन्याची जी कनिष्ठ शिल्लक असेल तिजवर केली जाईल. मात्र पांच हजारावरील शिल्लक रकमेस व्याज नाही. नियमांच्या प्रती बँकेंत अर्ज केला असतां मिळतील.

मुंबई ब्यांक आकोला ९।९।०९ — J. G. Ridland. एजंट

नो. नं २

### केशरांचें फूल मफ्त

पवित्र केशर ॥।= शुद्ध शिलाजित ॥ असली कस्तुरी २४ मणीरातिनती १ खालिस हींग ।= तो० सुंदर कामदार शाल ३ व
$३\frac{१}{२}+१\frac{१}{२}$ गज ६ ते १०

काश्मीर स्टोर्स श्रीनगर नं० १२

नो० नं० ८


### हिंदुस्थानावर अरिष्ट.

हिंदुस्थानांतील रहिवाशांच्या पाठीस ज्वर व हिवताप यांचें अरिष्ट प्रदीप्त लागलें आहे पण त्याचा प्रतिकार करण्यास बाटलीवाला यांचें हिवतापाचें औषध व गोळ्या हे रामबाण आहेत. ताप किंवा शीतज्वर येणारसें वाटतांच हें औषध घ्यावें. किं. १ रु.

**बाटलीवाला यांच्या निस्तेज लोकांसाठीं शक्तिकारक गोळ्या**

हें औषध घेतल्यानें भागवटा, मेंदूचे श्रम, पौरुषनाश, अशक्तता व क्षयरोगाचें स्वरूप, त्याप्रमाणें अजीर्ण इ. इ. विकार नाबडतोब दूर होतात. किं रु. १८८.

**बाटलीवाला यांचें दंतमंजन.**

हें दंतमंजन मायफळाशीं कांहीं इग्रजी औषधांचा वैद्यकीय रीतीनें मिलाफ करून बनविलें आहे. किं. ८४

**बाटलीवाल्याचें गजकर्णावर मलम.**

यानें गजकर्ण, कुजली खरूज यांचा विकार एका दिवसात नाहींसा होतो. किं. ८४

हीं औषधें सर्व औषधी विकणाऱ्या दुकानावर व डॉ. एच. एल. बाटलीवाला जे. पी. मु. वरली लेबोरेटरी दादर, मुंबई यांजकडे मिळतात.

नो० नं० ५

## चांदीचीं भांडीं.

### विकावयाचीं आहेत.

नाशिक येथें तयार केलेलीं सर्व प्रकारची सुबक व वाटदार भांडी आमचेकडे विक्रीस तयार असतात. भाव माफक व्ही. पी. नें अगर रोखीनें पाठ मालाचे खरेपणाबद्दल ग्यारंटी देऊ

**पुरुषोत्तम रामचंद्र वैशंपायन**
**रविवार पेठ नाशिक सिटी.**
नो. नं. ४

### ब्रह्मविद्या ग्रंथ रत्नमाला

या मासिकाचा वर्षारंभ माघ शु० ५ तिसऱ्या वर्षापासून ७२ पानांचें मासिक. वा० व० ८० खर्चासह तीन रुपये. यात **श्रीशंकराचार्य, शंकरानंद,** व **विद्यारण्य** यांचे उपनिषदावरील **भाष्य, आत्मपुराण** व **अनुभूतिप्रकाश** हे ग्रंथ क्रमानें मूळ, अन्वय, अर्थ व विवरण यांसह प्रसिद्ध होतात. यांत हल्लीं बृहदारण्यकाचा भाष्यार्थ चालू आहे. मागील दोन वर्षांतील वीस प्रकरणें १० रुपयांस घेऊन तिसऱ्या वर्षी वर्गणीदार होणारास 'वैशेषिक दर्शन' बक्षीस

सनातन वैदिक **धर्माचें, तत्त्वज्ञानाचें** व सामाजिक विषयांचें विवेचन करणारें--

### आचार्य

पाक्षिक, दर एकादशीस नियमितपणें प्रसिद्ध होतें. पृष्ठें २४ वा० व० ८० खर्चासह १ रु० ८ आणे वरील मासिक घेणारास फक्त १रु० वरील विषयांशिवाय यांत संस्कृत काव्यें, नाटकें व इतर लहान लहान ग्रंथें यांचाही परामर्श केला जातो. धर्म संबंधीं प्रश्नांचीं समर्पक उत्तरेंही दिलीं जातात नमुना मागवा.

पत्ता— विष्णुशास्त्री बापट.
२४१ सदाशिव पेठ पुणें.

नो० नं० ३

### नोटीस

नोटीस बेशर्मी सीताराम पांडुरंग गुरव रा० मंगरूळ पीर

यांसः—

खालीं सही करणार नोटीस देतो कीं तुम्ही माझे जवळून १ प्रामेसरी नोट रुपये ४०० चारशेची ता० ३१।१०।१४ इ० रोजीं लिहून घेतली परंतु आज तारखे पर्यंत रकमेचा भरणा आपण मला ४०० चारशे रुपयाचा प्रामेसरी नोटीचा दिला नाहीं यावरून तुमचे मनांत बेमानकी दिसते. तरी कळवितो कीं ती मी लिहून दिलेली प्रामिसरी नोट रद्द असे. तीवरून पुढें तुम्ही कोणतीही केलेली कारवाई कराल ती रद्द समजली जाईल. व त्याबद्दल जबाबदारी मजकडे नराहतां तुमचेकडे राहील. क० ता० ३०।३।१५

सही

चंद्रभान भयाजी संघी पाटील
इंझोरी द० खु०

नो० नं० ११२

### जाहिर नोटीस

सर्वत्रास या जाहीर नोटीसीनें कळवितो कीं रा० सीताराम पांडुरंग गुरव रा० मंगरूळपीर यांनीं मजजवळून १ प्रामिसरी नोट ४०० चारशे रुपयांची लिहून घेऊन रकमेचा भरणा दिला नाहीं. करितां त्यांचे जवळून या प्रामेसरी नोटीचें आधारें कोणी कोणतेंही देणें करूं नये. केल्यास तें रद्द समजलें जाईल. मला भरणा रकमेचा पावला नाहीं. सबब ती ता० ३१।१०।१४ ची प्रामेसरी नोट रद्द केली आहे कळावे.

ता० ३०।३।१५

सही

चंद्रभान भयाजी संघी पाटील
इंझोरी द० खु०

नो० नं० ११३

### नोटीस

रा० रा० रामेश्वर मुरजमल साहू दुकान केळीवेळी पोष्ट केळीवेळी

यांसः—

खालीं सही करणार यांजकडून नोटीसीनें कळविण्यांत येते कीं तुम्ही तुमचे मकानाचा सुतारी काम करण्याचा मक्ता आमचे पासून ता० २६।२।१५ रोजीं करारनामा लिहून घेऊन मक्ता आम्हास दिला व आम्हास नेण्याकरितां गाडी पाठविली. आम्ही येथें दुसरे कामावर होतो तें दुसऱ्यास देऊन समागमें दोन सुतार घेऊन आलो व कामास सुरुवात केली व ४ चार दिवस काम केलें व पांचवे दिवशीं आपण आम्हांस कळविले कीं चालू वर्षांत आम्हांस काम करण्याची इच्छा नाहीं. पुढील वर्षी पाहू. असें म्हणून काम बंद केलें व लागलीच गाडी बोलावून आम्हांस रवाना केलें. इकडे येण्याचे वेळीं आमचेपासून लिहून घेतलेला करारनामा व पैसेही न देतां आम्हांस रवाना केले. तर आपण असें न करितां आपले चालू असलेले काम चालू करून झालेल्या दिवसाची मजूरी देऊन टाकावी आम्ही काम करण्यास तयार आहो. नोटीस मिळाल्यापासून तीन दिवसाचे आंत आपले काम सुरू करावें न केल्यास आमचें सर्व झालेलें नुकसान आपलेकडून वसूल घेतले जाईल कळावे. ता. २७।३।१५

सही

रावजी वा॥ किसन सुतार
ताजनापेठ आकोला
द० खु०

नो० नं० ११४

### नोटीस

नोटीस बेशर्मी शंकर गुणवंतराव लंके राहणार आकोट

यांसः—

खालीं सही करणार यांजकडून नोटिसीनें कळविलें जाते की आम्ही तुमची सावरगांवची जमीन दरसाल ३५० रुपये देण्याचे कबूल करून ५ वर्षे पट्ट्यानें केली. हल्लीं हे पीक चौथें आहे दरसाल स्वामित्वाची रकम नक्त दिली असून सालमनकूरचे ३५० रुपयापैकीं पूर्वी २९६॥- दिले व तारीख २० मार्च सन १९१५ रोजीं राहिलेले ९३।≡ देऊन पावती मागितली असतां तुम्ही सांगितलें कीं "व्याजाबद्दल २० रुपये दे म्हणजे पावती देईन" दरसाल मजजवळून असेंच व्याज घेतलें. सालमनकूरचे व्याजाबद्दल आपणास पुष्कळ तऱ्हेनें विनंती केली पण आपण न ऐकतां मला व माझे बापाला तुम्ही स्वतः व आपले दोन नौकरांकडून थापडा मारल्या. व सबंध रुपयाची फिर्यादी करितो अशी धमकी दिली. सबब कळविले जातें कीं नोटीस पावतांच माझी पावती व नोटीस खर्च द्यावा. विनाकारण फिर्याद कराल तर तो खर्च मी देणार नाहीं माझा खर्च मजकून घेईन कळावें. ता० २२।३।१९१५ इ०

सही

मारुती वा॥ सुरेभान फुके राहणार
कडतवाडी प्रगणे आकोट नि० रेघ

नो० नं० ११५

## जाहीर नोटीस

नोटीस बेशमी सर्वत्र साहू सावकार लोकें. यांसः—

खालीं सही करणार नोटीस देतो कीं माझा मुलगा नामें भगवान वा अंतुजी रा. घोट ता० आकोला हा गैरचालीचा असून पैशाची व इस्टेटीची खराबी करीत आहे. तरी त्याचे नवळून कोणी माझी स्थावर जंगम इस्टेट गहाण, पट्यानें अगर विक्रीनें घेऊं नये. व त्यांस कर्जही देऊं नये. दिल्यास त्या बद्दल जबाबदारी माझे इस्टेटीवर अगर मजवर राहणार नाहीं. व कर्ज देणारे फसतील. सदहू चि० भगवान यांस ही ताकीद देऊन या नोटिशीची नक्कल दिली आहे. क० ता० ३१-३-१९ इ.

सही
सहीची निशानी आंगठा
अंतुजी वा। केवजी तरुणे
कुणबी रा० घोट पो०
पिंजर ता० आकोला
याचा खुद

नो. नं. ११७

## जाहीर नोटीस

मी खालीं सही करणार अशी जाहिर नोटीस देतो कीं कसबे शिरपूर तालुका वाशीम येथील नारायण लक्ष्मण ला. वैंडर याजपासून २९९८ नंबरचा आठ आण्याचा स्टांप सावकारास लिहून देण्याकरितां ता० २६।३।१९ इ० रोजीं घेतलेला मजकडून गहाळ झाला तो कोणास सांपडून त्याजवर माझे नांवचा कोणत्याही प्रकारें कोणी लेख केल्यास त्याबद्दल मी जबाबदार होणार नाहीं. ज्या कामाकरितां मी तो स्टांप घेतला होतां तें काम अ० नं० २९९२ तारीख २७।३।१९ इ० चा दुसरा स्टांप विकत घेऊन पुरें केलें आहे. करितां सदहू जाहिर नोटिशीनें सर्वत्र शेट सावकारास कळविण्यांत आलें आहे, कळावें तारीख २९-३-१९ इ०

दस्तुर राजाराम रामराव पठवारी रा० शिरपूर

सही
पुंजाजी वलद सुर्याजी मराठे
रा० येकांब प्र० शिरपूर
ता० वाशीम याची नि०
शाणी असे

नो० नं० ११८

## नोटीस

खालीं सही करणार यांजकडून नोटीस देण्यांत येते कीं, बळवंत लक्ष्मण यांस दिहून दिलेलें मुखत्यारपत्र तारीख २८-३-१९ पासून रद्द असे, कळावें ता० ३१-३-१९

सही
.किसन तुळशीराम अगरवाले
बळगांव

नो० नं० ११९

## नोटीस

रा० रा० गोपाळा वा। लक्ष्मण सोनार साकरकार रा० मौजे उचेगाव ता० दारव्हा जि० यवतमाळ यांसः—

खालीं सही करणार यांजकडून नोटीस देण्यांत येते कीं, तुमची बहिण नामे दिवटी उर्फ लक्ष्मी ही माझी लग्नाची बायको आहे. आमचे बंधु बंधुचा वाद झाल्यामुळें तीजला मी तुमचे येथें आणून घातलें. मध्यंतरी मी तिजला घेण्याकरितां एक दोन वेळा आलों असतां तुह्मी तिजला पाठविलें नाहीं. हल्लीं ता० २३।३।१९ इ० रोजीं मी तुमचे येथें तिजला नेण्यास आलो असतां तुह्मी चार लोकांसमक्ष ह्मटले कीं, तुह्मी तिजला नेत असाल तर पावती करून द्यावी कीं, आह्मी न वागऊ तर खाण्याबद्दल २ दोन रुपये महिना देऊं. याप्रमाणें तुह्मी १ एक आण्याचे टिकीट काऊन वरप्रमाणें कागद लिहून घेतला असोन तरी तुह्मी तिजला पाठविलें नाहीं. तरी या नोटीसीनें कळवितो कीं, ही नोटीस पावले तारखेपासून आठ दिवसाचे आंत आमचे घरीं आणून घालावे. या प्रमाणें न केल्यास तुमचेवर रीती प्रमाणें योग्य कोर्टांत फीर्याद केली जाईल. व ता० २३।३।१९ इ० रोजीं जो कागद खावटीबद्दल मजजवळून गांवचे पाटलाकडून व तुह्मी धमकी देऊन घरांत नेउन मज बरोबर बापकोस पाठविण्याची लालुच दाखवून लिहून घेतला तो कागद पावतीचे टिकीट काविलेला रद्द असे कळावे.

ता० २७।३।१९ इ०

सही
बाळजी राघोजी सोनार
रा० मोरवड द० खु०
नो० नं० १२०

## नोटीस

नोटीस बेशमी बळीराम तायडे रा० कुप्ट ता० इलिचपूर जि० उमरावती यांसः—

खालीं सही करणार यांजकडून नोटीस देण्यांत येते कीं तानी मर्द गणु तोडखेडे रा० उगवे ता० आकोला इनें सांगितले कीं तिची माची नामे काशी ही विधवा आहे तिचा नवरा मेला आहे व तिला आईबाप नाहींत असें तिनें सांगितले ह्मणून खालीं सही करणार यानें तिच्याशीं अदाजा १॥ महिना झाले पाट लाविला. पण आतां येकोरी ता० दर्यापूर येथील बळीराम दाढे व साहेबराव देशमुख हे माझे गांवीं ह्मणजे पळसोद ता० आकोट येथें आले होते तेव्हां त्यांनीं सांगितले कीं वरील काशी ईजला आईबाप व भाऊ आहेत ते येकोरी ता० दर्यापूर येथें राहतात व तिचा नवरा बळीराम जिवंत आहे. असें सागितल्यावरून ही गोष्ट समजल्या पासून ताबडतोब ३ तीन दिवसाचे आंत तुह्मांस नोटीस देण्यांत येते कीं तुह्मी आपली बायको घेऊन जाणें. आह्मास वरील तानीनें फसविलें व शिवाय ३०० रु० ही आमचे जवळून घेतले आहेत. कळावे.

सही
बापुना वा। कडतानी
रा० पळसोद.
ता० आकोट नो० नं० १२१

वऱ्हाडसमाचार

मिति चैत्र वद्य ६ शके १८३७

## अबकारी उत्पन्न.

जमीन महसूलाची जशी बाब तशीच अबकारीची बाब होय. शेतीच्या उत्पन्ना बरोबरच हें अबकारीचें उत्पन्न स्पर्धा करीत आहे. किंबहुना कांहीं वर्षांनीं अबकारी उत्पन्न हीच मुख्य श्रेष्ठ बाब होऊन बसण्याचा रंग दिसत आहे. सरकारला ही एक सोन्याची खाणच सापडली आहे असें ह्मटलें तरी चालेल. या दांडग्या उत्पन्नाच्या मुळाशीं मोठा दोष आहे तो एवढाच कीं प्रजेच्या व्यसनाधीनतेवर हा सगळा उत्पन्नाचा किल्ला रचलेला आहे. जेव्हां जेव्हां सरकारला विनंति करण्यांत येते कीं लोकांच्या व्यसनाला आळा घालण्यासाठीं, त्यांची नीतिमत्ता सुधारण्यासाठीं व त्यांस तेजस्वी प्रजाजन करण्यासाठीं सरकारानीं ही उत्पन्नाची बाब मोडून टाकावी. तेव्हां सरकारी अबकारी पद्धती ह्मणजे लोकांच्या व्यसनावर मोहीमच होय. अबकारीचा कर अत्यंत वाढवून लोकांची व्यसनें अगदीं कमी करावी आणि जीं व्यसनें अनिर्वाह पक्षाची असतील, तेवढ्यांना मादक द्रव्यें चांगल्या प्रतीचीं पुरवावी असा सरकारतर्फे कोटीक्रम लढविण्यांत येतो. अबकारी पद्धतीच्या मंडणासंबंधानें नुकतेंच एक पुस्तक इंडिया सरकारनें प्रसिद्ध केलें आहे आणि त्यामध्यें सर्व स्थानिक सरकारचीं मतें संकलित केलीं असून त्यांवर हिंदुस्थान सरकारचें भाष्यही शेवटीं दिलेलें आहे. या येवढ्या मोठ्या पुस्तकाचा मथितार्थ असा निघतो कीं अबकारीचें उत्पन्न मोठ्या भरभराटींत आहे एवढ्याच कारणावरून अबकारी द्रव्याचें लोक अधिक सेवन करितात असें निष्पन्न होत नाहीं. सोमरस घ्या, अफू घ्या, किंवा गांजा वगैरे मादक पदार्थ घ्या यासर्वांची उत्पन्नें जरीं गेल्या आठ दहा वर्षांत सवाईनें दिढीनें वाढलीं आहेत, त्या मानानें या पदार्थांचा खप मात्र फार अल्पस्वल्प प्रमाणांत वाढलेला दिसतो.

अबकारी खातें ह्मणजे सरकारी तिजोऱ्या भरून देण्यासाठीं प्रजेनें चालू केलेला सोमयज्ञच होय. सरकारी सिद्धांत सकृत् दर्शनीं कितीही गोड दिसले तरी हा सर्व पैसा गोळा करण्याचा व्यापार व्यसनाधीन कंगालांना अधीक कंगाल करणारा आहे. व्यसनाच्या गर्तेत हतबल झालेल्या लोकांच्या संसारावर उभारलेली ही दौलत होय. सांप्रतच्या सुधारलेल्या विचारांच्या आवृत्तीपुढें हें जुनें सरकारी विचारनिर्माल्य फेकूनच दिलें पाहिजे. ज्याचा पाय व्यसनामुळें खोलाकडे अधिक ओढत चाललेला आहे, त्याला हें अबकारी कर ह्मणजे अधिकाधिक बुडविणारी मगरमिठी होय. कर मोठ्यांत मोठा केल्यानें लोक दारू प्यावयाचे कांहीं सोडीत नाहींत आणि कदाचित् त्यांच्या व्यसनाला थोडी बहूत आडकाठीही होत आहे तरी पण ही सोमरसाची वल्ली सुटणारी नाहीं. दारू पिण्याचें व्यसन सरकार वाढवीत नाहीं ही गोष्ट खरी असेल आणि तेवढ्या बद्दल सरकारी या सुंदर धोरणा संबंधानें प्रजाजन धन्यवादही गातील पण मुद्याचा प्रश्न निराळाच आहे. सोमरस सरकारी कराला पात्र आहे कीं नाहीं या प्रश्नाचें उत्तर सरकारी कोषांत कोठें आढळत नाहीं. आमच्या मतें सोमरस कराला पात्रच नाहीं. ज्याच्या योगानें मनुष्य तात्पुरता सुखानुभव घेतोसा दिसतो पण लागलीच तो आपल्या आयुष्याचे दिवस कमी करितो. जीवनाचे पाश सुकवितो आणि दुनियेदारीला तितक्या मानानें अपात्र होतो. अबकारीचे पदार्थ कराला अपात्र आहेत इतकेंच नव्हेतर ते रोग्याला जसें औषध तशा दृष्टीनें व्यसनाधीन लोकांना फार तजवीजीनें व अगदीं संकूचित दृष्टीनें पुरविण्यांत आले पाहिजेत. लोकांच्या कामगिरीवर, उद्योग धंद्यांवर व व्यापार वृद्धीवर कर बसविले तर ते तितके जाणवत नाहींत, पण त्याच्या उलट सरकारी मासला दिसतो. सालोसाल अबकारीचे जेव्हां हरास होतात तेव्हां उत्पन्न वाढविण्याच्या ज्या लढाया होतात, त्या राष्ट्राला लघुपणा आणणाऱ्या होत राष्ट्राची अबकारी पद्धती त्या त्या राष्ट्राच्या प्रगतीचें पाऊल दर्शविते आणि या विचाराच्या दृष्टीनें पाहतां पुष्कळशा सुधारणेच्या नांवाखालीं ज्या वाईट गोष्टी टिकल्या जात आहेत त्या पैकीं अबकारी खातें ही एक होय. रा० रा० लाईट जॉर्ज हे मुसद्दी गेल्या फेब्रुवारीच्या २८ तारखेस विलायतेंत बोलतांना ह्मणाले कीं या दारूच्या व्यसनामुळें इतका आमच्या राष्ट्राचा ऱ्हास होत आहे कीं सर्व जर्मन आगबोटींच्या सुरुंगानें ही तितका ऱ्हास होणार नाहीं. या सोमरसाच्या घातुक परिणामामुळें कांहीं राष्ट्रें आपलीं अबकारीचीं उत्पन्नें फेकून देऊन आपापल्या लोकांना त्या व्यसनापासून अलिप्त ठेऊन पावन करीत आहेत. असाच प्रयत्न हिंदुस्थान सरकारनें हातीं घ्यावा किंबहुना जगाला या बाबतींत उदाहरण घालून द्यावें असें आह्मास वाटतें आणि सरकार जर असें अत्युच्च कार्य हातीं घेईल तर लोक ही एक दिलानें सरकारच्या मदतीला पुढें येतील.

## सुशिक्षित स्त्रीचें चित्र.

'ज्ञानांजन' मासिक पुस्तकाच्या मार्चच्या अंकांत आधुनिक सुशिक्षित स्त्रीचें शब्दचित्र दिलें आहे तें व्यंगचित्र आहे असें मानण्याचें कांहीं कारण दिसत नाहीं. वस्तुस्थिति सदोष असली तर ती तशी आहे हें प्रांजळपणें मान्यकरून तींतले दोष घालविण्याचा प्रयत्न करणें यांतच खरा सुधारकपणा आहे. सध्याची सुशिक्षित स्त्री कशी असते याविषयीं ज्ञानांजनांतले लेखक ह्मणतात— आपण व्यवहारांत पाहतों कीं बारा वर्षांचा मुलगा स्वतः काळजी व्यावयास ही समर्थ नसतो.... पण बारा वर्षांची मुलगी संसारासारख्या अतिगहन विषयांत स्वतःच

अनुभवाशिवाय पारंगत समजली जाते. तिनें अशा गहन विषयावर हवें तें लिहावें. तें छापून काढण्यास व तिची वाहवा करण्यास संपादकवर्ग उत्सुक असतो. तीनचार यत्ता शिकलेल्या मुलीस बी० ए० ची योग्यता अनायासें प्राप्त होते. हव्या त्या विषयावर ती झटादिशीं आपलें पाक्त मत देऊन मोकळी होते, व तिच्या मताला सुशिक्षित समाजांत मान ही मिळतो. ज्ञानांजनाच्या या चित्रांत अतिशयोक्ति आहे असें ज्यांस वाटत असेल त्यांनीं मासिक मनोरंजन वगैरे सारख्या मासिक पुस्तकांतले स्त्रियांचें लेख किंवा सामाजिक परिषदेसारख्या संस्थांतली स्त्रियांचीं भाषणें लक्षपूर्वक वाचून पाहावीं. गेल्या मे महिन्यांत पुण्यास भरलेल्या सामाजिक परिषदेपुढें एका अल्पवयी सुशिक्षित स्त्रीनें लहान तोंडीं मोठा घास घेऊन केलेलें भाषण व जमलेल्या मंडळीनें टाळ्या पिटून केलेली वाहवा हीं पाहिलीं म्हणजे ज्ञानांजनाच्या म्हणण्याची सत्यता कोणालाही सहज पटेल अशी आमची खात्री आहे.

## मुलांचा महाराष्ट्र

पुणें जिल्ह्यांतील तळेगांव दाभाडे येथील समर्थ विद्यालयाच्या नांवाखालीं जीं पांच सात पुस्तकें आजपर्यंत प्रसिद्ध झालीं आहेत त्यांनीं राष्ट्रीय शिक्षणाला फार मोठी मदत केली आहे इतकेंच नव्हेतर त्या पुस्तकांनीं नवीन पद्धतीच्या शिक्षणाचा चांगला पायाच घालून दिला आहे असें म्हणण्यांत कांहीं अतिशयोक्ती नाहीं. रा० रा० जनार्दन विनायक ओक एम० ए० यांनीं चालविलेल्या "लोक शिक्षण" मासिकाच्या कार्यालयांतून मुलांचा महाराष्ट्र हा ग्रंथ नुकताच प्रसिद्ध झालेला आहे. यांत मराठ्यांचा इतिहास गोष्टींच्या रूपानें फार उत्तम रितीनें दिलेला आहे. आनंदकंदें राजश्री वासुदेव गोविंद आपटे यांनीं ही अशा प्रकारचा प्रयत्न पूर्वी केलेला आहे. पुस्तकाचे कर्ते रा० रा० गोविंद अनंत मोडक बी० ए० हे असून पुस्तकाच्या मानानें एक रुपया किंमत फार थोडा आहे. एकंदर या गोष्टी व आख्याइका वाचतांना मन फार प्रसन्न होतें आणि ग्रंथाची भाषा फार प्रेमळ, उद्दीपक व ओजस्वी आहे विद्यार्थ्यांच्या हातांत असा नागी ग्रंथ पडत आहे हें नवी उत्तरकालाचें प्रसादचिन्हच होय. सर्वच गोष्टी हृदयंगम होतील असा विषयीं इतिहासाचें परिशीलन फार मोठें केलेलें आहे. राजश्री जनार्दनपंत ओक यांनीं या पुस्तकाला जी प्रस्तावना जोडली आहे त्या पैकीं कांहीं मुख्यभाग पुनरुक्तीच्या दोषाला न भीता ही आम्ही खालीं उधृत केला आहे. त्यावरून या नव्या ग्रंथाचें महत्व लौकर लक्षांत येईल.

इतिहास शिकविण्याच्या अर्वाचीन पद्धतीमध्यें Source method म्हणून एक पद्धत पाश्चात्य राष्ट्रांत जारीनें सुरू आहे. या रीतीनें इतिहास शिकविणारांना ज्या काळाचा इतिहास वाचावयाचा असेल तत्कालीन व्यक्तींचीं पत्रें, ग्रंथ, नाणीं व इतर साधनांचा उपयोग करून प्राचीन काळच्या घडामोडींचें प्रत्यक्ष चित्रच विद्यार्थ्यांच्या डोळ्यासमोर उभें राहील अशी विषयाची मांडणी करावयाची असते. हेतु हा कीं विषय मनोरंजक व्हावा, स्फूर्तिदायक प्रसंगांचा मनावर कायम ठसा उमटावा व चिकित्सक अध्ययनास जरूर अशी संशोधक पद्धतीची आवड लागावी. प्रस्तुत पुस्तकांत ह्या महत्वाच्या पद्धतींचें अवलंबन केलें आहे हें लक्षांत आल्यावाचून राहणार नाहीं.

शाळोपयोगी एखादें पुस्तक पाहिलें असतां त्यामध्यें ठराविक सन, तारखा, तहाचीं कलमें इ. मंत्री दिलेली असते. त्यामुळें विषय कंटाळवाणा होतो. शिक्षकालाही राजाचीं नावें व तारखा इत्यादि घोकून घेण्यापलीकडे कांहीं या विषयांत आहे याची जाणीव नसते. हा दोष चालू शिक्षण पद्धतीचा दोष. ही पद्धत बदलून त्या प्रमाणें पुस्तकांच्या रचनेंत ही बदल झाला पाहिजे. अलीकडे गोष्टींच्या रूपानें महाराष्ट्राच्या इतिहासाची माहिती देण्याचा प्रयत्न दोघा तिघांनीं केलेला आहे. पण पूर्वी सांगितलेल्या विशिष्ट गुणांनीं हें पुस्तक अधिक सरस ठरेल अशी उमेद आहे. एकएका गोष्टीमध्यें एकेक प्रसंग वर्णिलेला असून सर्व गोष्टी मिळून मराठ्यांचा संगतवार इतिहास विद्यार्थ्यांनें शिकल्याप्रमाणें व्हावें अशी योजना केली आहे व निवडलेले प्रसंग मुलांच्या मनास उदात्त वळण लावणारे असेच आहेत.

मराठी साम्राज्याच्या उत्कर्षकाळीं अनेक नररत्नें होऊन गेलीं. त्यांच्यासंबंधानें पुष्कळ मनोरंजक व चोखपर अशा आख्यायिका प्रचलित आहेत. त्यापैकीं कांहीं पारीशिष्टामध्यें दिल्या आहेत. त्यांपासून करमणूक होऊन विद्यार्थ्यांस बोधही मिळेल अशी आशा आहे. इतिहास व भूगोल या दोन विषयांचा एकजीवच आहे. नुसता भूगोल पाठ करून घेणें हा शिक्षणपद्धतींतील अनेक दोषांपैकीं एक होय. इतिहास शिकतांना जसजसें कारण पडेल तसतशी भूगोलाची माहिती दिल्यानें भूगोल मनावर चांगला ठसतो; व वर्णिलेल्या ऐतिहासिक प्रसंगांचा विद्यार्थ्यांच्या मनावर स्पष्ट ठसा उमटतो, अर्थात् इतिहास वाचतांना नकाशा हा नेहमी जवळ ठेविला पाहिजे. नकाशाशिवाय इतिहासाचें पुस्तक वाचणें अगदीं नीरस व कंटाळवाणें होतें. म्हणून प्रस्तुत पुस्तकास दोन नकाशे जोडले आहेत. गांवें, प्रांत वगैरेंचीं जुनीं नांवें सर्व आजच्या नांवाशीं जुळत नाहींत. त्यामुळें पूर्वीच्या काळाचा दर्शक असा नकाशा करणें फार अवघड काम असतें. तथापि बरेच श्रम करून तीं तीं स्थलें ठरवून नकाशा तयार करण्याचा प्रयत्न केला आहे. अजूनही कांहीं स्थलांचा निकाल लागत नाहीं अशीं स्थळें नकाशांत अंदाजानें भरलीं आहेत. मराठा साम्राज्याचा बिनचूक व साधारण नकाशा भारतेतिहाससंशोधक मंडळानें तयार केल्यास एक महत्कार्यच केल्यासारखें होईल.

या वरील उल्लेखावरून मुलांच्या महाराष्ट्राचें आम्ही प्रेमानें अभिनंदन करितों आणि असा ग्रंथ सरकारी खात्याकडून सर्व शाळागृहांतून सुरू होईल तर नवीन पिढीचें कोट कल्याण होईल असा आमचा पूर्ण भरंवसा आहे.

## शिक्षण व देशीभाषा.

गेल्या महिन्यांत वरिष्ठ कायदे कौन्सिलच्या बैठकींत शिक्षण विषयक एक महत्वाचा ठराव आ० रायानिंगर यांनीं कौन्सील पुढें आणला होता दुय्यम प्रतीचें इंग्रजी शिक्षण देणाऱ्या शाळांतून मात्र भाषेंतून शिक्षण दिलें जावें आणि इंग्रजी भाषा हा विषय सक्तीनें मुलांना शिकविला जावा अशा आशयाचा हा ठराव होता. ठरावांत उपस्थित केलेला प्रश्न फार महत्वाचा असून त्या संबंधानें आज बरीच वर्षे चर्चा सुरू आहे व सरकारातर्फेंन ही या बाबतींत वेळोवेळीं ठराव प्रसिद्ध केले गेले आहेत. हल्लींची शिक्षणपद्धति सर्व बाजूनें दोषरहित नाहीं ही गोष्ट लोकांच्या व त्याच प्रमाणें सरकारच्या नजरेस येऊन चुकली आहे हल्लींचे पदवीधर निरनिराळ्या विषयांचें ज्ञान संपादन करतात परंतु त्या पासून त्यांना तादृश उपयोग न होतां केवळ भारवाहकाप्रमाणें त्यांची स्थिती झालेली दृष्टीस पडते. सामान्यतः पाहतां शोधक बुद्धी चौकसपणा किंवा एखाद्या आवडत्या विषयाचें मार्मिक बुद्धीनें पारिशीलन करणें हें किंवा या सारखे इतर गुण हल्लींच्या पदवीधरांत दिसून येत नाहींत.

वरील गुणांनीं मंडीत अशीं विद्वद्रत्नें हल्लीं मुळींच नाहींत असें नाहीं परंतु यावरून हल्लींची शिक्षणपद्धती निर्दोष आहे असें मात्र ठरत नाहीं. असें जर आहे तर शिक्षण देण्याच्या पद्धतींत चूक कोठें होत आहे याचा विचार करून चुकीची दुरुस्ती जितक्या लौकर होईल तितकी करणें हें सरकारला व लोकांना दोघांनाही सारखेंच हितावह होणार आहे.

इंग्रजी चौथे किंवा पाचवे यत्तेपासून सर्व विषयांचें ज्ञान इंग्लिश भाषेच्याद्वारें संपादन करावयाचें म्हटलें म्हणजे मुलांच्या मनावर वाजवीपेक्षां फाजील बोजा पडतो ही गोष्ट कोणालाही नाकबूल करतां येणार नाहीं. ज्या भाषेच्याद्वारें मुलांना विषय समजवून दिले जातात ती भाषा उत्तम तऱ्हेनें अवगत नसल्यास विषयांचा समजूत मुलांना कितपत होईल हें निराळें सांगावयास नको. सामान्य बुद्धीच्या मुलाला चौथे किंवा पांचवे यत्तेंत इंग्रजी भाषेचें ज्ञान तात्पुरतें असल्या कारणानें त्या भाषेच्याद्वारें जो विषय त्याला समजवून दिला जातो त्या विषयाचें ज्ञानही अर्धे कच्चेंच असणार व अशा तुटपुंज्या ज्ञानानें मुलास कोणत्याच तऱ्हेचा फायदा होत नाहीं. सबब दुय्यम प्रतीचे इंग्रजी शिक्षण देणाऱ्या शाळांतून मात्र भाषेच्याद्वारें शिक्षण दिलें जावें असें ठराव पुढें मांडणारे आ० रायानिंगर यांचें म्हणणें होतें. मात्र भाषेंतून शिक्षण देण्यांत ज्या अडचणी आहेत त्या अपरिहार्य नसून थोड्याशाच अवधींत व स्वल्प खर्चानें दूर करता येण्या सारख्या आहेत सबब या महत्वाच्या विषयाचा सरकारनें कायमचा निकाल समाधान कारक रितीनें लावावा असें आ० मि० रायनिंगर यांचें म्हणणें होतें. या ठरावावर जीं भाषणें झालीं त्यांत ह्या प्रश्नाचा सर्व दृष्टीनें चांगलाच ऊहापोह करण्यांत आला. जशाचा तसाच ठराव पास करण्यास कोणाची फारशी संमती मिळाली नाहीं. बहुतेक भाषणें ठरावाच्या विरुद्धच झालीं व आ० पंडित मदन मोहन मालवीय व आ० मि० बानर्जी यांनीं काहीं फेरफार सुचवून ठराव पास करण्यास संमती दिली. मध्यप्रांताचे कौन्सिलर मि० दादाभाई हे या ठरावाविरुद्ध होते त्याचें म्हणणें असें पडलें कीं हल्लींची वेळ अशा तऱ्हेचे वादविवाद विषयक ठराव कौन्सिलपुढें मांडण्यास अगदीं अयोग्य आहे. सरकार व प्रजा यांचीं मनें हल्लींच्या भयंकर प्रसंगामुळें अगदीं अस्वस्थ होऊन गेलीं आहेत. सबब अशा तऱ्हेचे चर्चात्मक विषय कौन्सिलपुढें आज मांडणें म्हणजे या अस्वस्थतेंत भरच जास्त भर घालण्या सारखें आहे.

कोणतीही गोष्ट योग्य वेळ पाहून करणें हें चांगलें असा सामान्य नियम आहे व या दृष्टीनें पाहिलें असतां वरील ठराव पूर्ण शांततेच्याकाळीं कौन्सिलपुढें वादविवादाकरितां आला असतां तर बरें झालें असतें, परंतु एकंदर या ठरावावर झालेल्या भाषणाकडे पाहिलें असतां झालेल्या वादविवादांपेक्षां दुसऱ्या कोणत्याही वेळीं अधिक चर्चा करता आली असती असें म्हणण्यास कारण नाहीं. आ० मि० दादाभाई यानीं आपल्या भाषणांत असें म्हटलें आहे कीं, इंग्रजी शिक्षणाच्या योगानें ह्या देशांत ज्ञानाचा फैलाव होऊन सर्व बाजूनें झपाट्यानें सुधारणा होत आहे, परंतु ठरावांत सुचविल्या प्रमाणें देशी भाषांच्या द्वारें शिक्षण देण्याचा उपक्रम केल्यास आमची सर्व तऱ्हेनें पीछेहाट होईल. इंग्रजी शिक्षण सुरू झाल्यापासून आमचा पुष्कळ फायदा झाला आहे ही गोष्ट खुद्द ठराव पुढें मांडणारे आ० रायनिंगर यांनाही नाकबूल नाहीं व कोणालाही नाकबूल असणें शक्य नाहीं. इंग्रजींत अफाट ज्ञान भांडार आहे हें खरें. प्रश्न एवढाच आहे कीं या खजिन्याची किल्ली देशी भाषांच्या द्वारें विद्यार्थ्यांच्या हातांत दिल्यास खजिना कायमचाच बंद राहण्याची भिती आहे कीं काय? आम्हास तर असें वाटते कीं ठरावांत नमूद केलेल्या रितीनें मात्र भाषा आणि इंग्रजी भाषा यांची सांगड घातल्यास फार फायदा होणार आहे.

विद्यार्थ्यांनां इंग्रजी मुळींच शिकवूं नये असें कोणाचेंच म्हणणं नाहीं. उलट पक्षीं इंग्रजी भाषा हा एक स्वतंत्र विषय मुलांना सक्तीनें शिकविला जावा व बाकीचे विषय देशी भाषाचे द्वारें समजविले जावे व ही व्यवस्था मुलांना इंग्रजीचें ज्ञान चांगलें होई पर्यंतच अमलांत असावी असें ठरावांतील भाषेवरून स्पष्ट दिसून येत आहे. हा ठराव पास झाल्यावर मुलांचें इंग्रजी कडचें लक्ष कमी होवून त्यांच्याकडून इंग्रजीभाषेंत असलेलें ज्ञान भांडार खोललें जाणार नाहीं व त्यामुळें आजपर्यंत झालेल्या सुधारणेची पिछेहाट होईल ही ना० दादाभाई ची भीती अगदीं निराधार आहे.

मात्र भाषेच्या द्वारें मुलानां शिक्षण देण्याविरुद्ध नेहमीं असा एक आक्षेप घेण्यांत येत असतो कीं या भाषांतून

निरनिराळ्या विषयांवर शाळा खात्यांतून उपयोगांत आणण्यासारखीं क्रमिक पुस्तकें नाहींत; परंतु या आक्षेपांत विशेष जोर आहे असे आम्हांस वाटत नाहीं. इंग्रजी शिक्षण कमी झाल्यापासून त्या भाषेंत उपलब्ध असलेले ज्ञान आपल्या देश बांधवांना मिळावे या सद् हेतूनें प्रेरित होऊन हिंदुस्थानांत निरनिराळ्या विद्वान लोकांनीं अनेक तऱ्हेनें प्रयत्न केले आहेत. कोणी इंग्रजी ग्रंथांचीं भाषांतरें केलीं आहेत. कोणी रुपांतरें केलीं आहेत तर कोणी मातृभाषेंत स्वतंत्र ग्रंथ केले आहेत. तेव्हां मातृ भाषेंतून शिक्षण देण्यास पुस्तकांची उणीव आजन्म भासेल असें आम्हांस वाटत नाहीं, व कदाचित भासली तरी अल्प काळांतच ती भरून निघेल व या बद्दल कोणत्याही रितीनें शंका बाळगण्याचें कारण नाहीं. आ० पंडित मदन मोहन मालवीय यांनीं आपल्या भाषणांत या आक्षेपाचें निरसन करतांना असें म्हटलें आहे कीं, खुद्द इंग्लंडांत चवदाव्या शतकांत इंग्रजीच्या द्वारें शिक्षण देण्यांत प्रथम सुरवात झाली व त्यावेळेसही इंग्रजी भाषेंतून शिक्षण देण्याच्या ठरावाच्या विरुद्ध पक्षाकडून अशाच तऱ्हेचा कोटीक्रम करण्यात आला होता. परंतु अशा तऱ्हेचा कोटिक्रम किती पोकळ आहे हे ठरविण्यास खुद्द इंग्लंडचेंच उदाहरण पुरेसें आहे. देशी भाषांना उत्तेजन मिळावें अशी सरकारचीही इच्छा आहे ही गोष्ट सरकाराकडून या विषयासंबंधीं वेळोवेळीं पास झालेल्या ठरावावरून दिसून येईल; सबब या प्रश्नाचा निकाल देशी भाषांच्या वतीनें कायमचा लागेल अशी आशा करण्यास बरीच जागा होती परंतु दुःखाची गोष्ट ही कीं या ठरावास पाठबळ फारच कमी किंबहुना मुळींच मिळालें नाहीं म्हटलें तरी चालेल; तथापि, ना० सर हारकोर्ट बटलर यांनीं आपल्या भाषणांत असें सांगितलें कीं, या विषया संबंधानें चौकशी करण्याकरतां कमेटी नेमावी किंवा नाहीं असें प्रांतिक सरकारास विचारण्यास आपल्याकडून कोणत्याही प्रकारें हरकत नाहीं. परंतु ज्याअर्थीं कौन्सिलांत या ठरावास जोराचा विरोध करण्यांत आला त्याअर्थीं हल्लीं चालू असलेलें युद्ध संपेपर्यंत आपणास कांहींच करतां येणार नाहीं लढाई संपल्यानंतर प्रांतिक सरकारास वर नमूद केलेली पृच्छा करण्यांत येईल. इतकें आश्वासन मिळाल्यावर आ० मि० रायनिंगर यांनीं आपला ठराव मागें घेतला व त्या योगानें देशी भाषांच्या दैवाचे पारडें कोणत्या बाजूस झुकतें ही गोष्ट ही अनिश्चितच राहिली तथापी ना० रायनिंगर यांनीं निर्भीडपणे व मुद्देसुद आणि मार्मिक भाषण करून देशी भाषांच्या वतीनें आपल्याकडून होण्यासारखी कामगिरी उत्तम रीतीनें बजाविली यांत बिलकूल शंका नाहीं व या बद्दल देशी भाषांच्या भक्तांनीं त्यांचे आभार मानावे तितके थोडेच आहेत

## महायुद्ध

### “ इतिश्रीचीं चिन्हें ”

प्रेमसी हा आस्ट्रियाचा आर्मिकप किल्ला होता. याला राशीयन सैन्याचा वेढा पुष्कळ दिवस पडला होता. किल्यांतील आस्ट्रियन सेनापती व इतर सैनिक यांची अन्न सामुग्री संपली तरी देखील फार विलक्षण शौर्यानें त्यांनीं शत्रूशीं ६ महिने सामना केला. शेवटीं किल्यांतील दारू गोळा व तोफाही शत्रूच्या हातीं पडूं नये व आपल्याच दारू गोळ्यानें आपलेच लोक मरूं नयेत म्हणून या युद्धसाधनाचा नाश करून शेवटीं अन्नाचा ग्रास संपेपर्यंत लढाई केली व किल्ला राशियन सैन्याच्या हवालीं करून दिला. तसेंच पश्चिमेच्या बाजूला नॅव्हचापेली येथें जें प्रचंड घनघोर युद्ध झालें त्यांत इंग्लिश फ्रेंच व इंडियन सैन्यानें अतुल पराक्रम केला व जर्मन सैन्यास बेरीस आणिलें. जर्मन सैन्यानें ही हा प्रेसच्या दक्षिणेस सेंट एलोई या खेड्याजवळ एक रात्रभर विलक्षण पराक्रम केला. आणि जय अपजय करित करीत शेवटीं जर्मन सैन्याचा पाडाव करण्यांत आला. भुयारांतून सैनिक बाहेर पडत व शत्रूवर मारा करीत त्यावेळीं इंडियन लष्करानें मोठी वाहवा मिळविली व इंडियन सैन्यानें डिक्समुड जवळील येर नदीचा काठ सर केला आहे. जर्मन सैन्यानें पुष्कळशा भुयारांना सुरुंग लावून उडवून दिले पण इतक्या निकराच्यावेळीं फ्रेंच सैन्यानें परथिस व लॉसाइन किल्ले सर केले आहेत. जर्मनीनें अटलांटा, किंगार, व लेक्यूवारडेन इत्यादि मालाच्या बोटी बडवून टाकल्या व परवां साउथ आफ्रिकन मेल ही आगबोट गोळी बार घालून बुडवून टाकली. हे रानटी प्रकार जर्मन साम्राज्याच्या युद्धाला शोभत नाहींत. जर्मनीची खोड तोडण्यासाठीं ग्रेटब्रिटननें जर्मनीचा माल समुद्रांतून येऊं द्यावयाचा नाहीं. किंवा जर्मनींत जाऊं द्यावयाचा नाहीं, असा कडक बंदोबस्त केला आहे. परिणामी या उपास मारानेंच जर्मनीचें राज्य लयास जाईल.

डार्डनेल्स या सामुद्रधुनींतील एलिझाबेथ नांवाची लढाऊ आगबोट ग्येबे पॉर्ट येथील बराखी व ठाणें तोफांनीं उडवून देण्यात आलें. या वेळीं बुव्हेट हें फ्रेंच आरमार व दुसरीं दोन इंग्लिश आरमारें याचा शत्रूनें विध्वंस केला तरी देखील किल्यावर किल्ले सर करण्याचा धडाका चालू आहे. राशियन जहाजानें बॉसपरस सामुद्रधुनीच्या किल्याजवळ जंगी लढाई केली व एका तुर्की पाणबुड्या बोटीला पळवून लाविलें. इकडे या जशा लढाया चालल्या आहेत तसेंच दक्षिण आफ्रिकेच्या किनाऱ्यावर जॉन फारनांडिस बेटाजवळ ड्रेसडेन जर्मन लढाऊ जहाज बुडविल्यापासून त्या बाजूनें जर्मनीचे पाय अधिक गळत चालले आहेत. खुद्द फ्रेंच सेनापति सर जॉन फ्रेंच यास देखील ही लढाई फार दिवस टिकेल असें वाटत नाहीं आणि उत्तरोत्तर येत असलेल्या तारावरून ही बातमी खरीच ठरत चालली आहे. मोठमोठीं राष्ट्रें जेव्हां अशा लढाया करतात तेव्हां सर्वच आपआपल्या साम्राज्याचा झेंडा मिरवितात आणि प्रत्येकाला आपली बाजू ईश्वरप्रणीत आहे असें वाटतें. अशा वेळीं अमेरिकेसारख्या त्रयस्थ राष्ट्रांनीं मध्यस्थी केली पाहिजे असा सर्वत्र ध्वनी ऐकूं येऊं लागला आहे. सांप्रतचा मनु असा दिसतो कीं बंधुभावानें परस्परांच्या स्वातंत्र्याला लहान मोठेपणा लक्षांत न आणतां मान देतील व त्याच स्वातंत्र्याकरितां लढतील व त्यांच्याच बाजूला श्रीकृष्ण आहे व त्याच बाजूला विजय संपदा लाभल्या पाहिजेत.

## स्टँडन शाळा.

गेल्या २२ मार्चला उमरावती येथें हें नवें शालागृह रा० स्टँडन कमिशनर साहेब यांच्या हातानें उघडण्यांत आलें. उमरावतीचे ऑनरेबल माजिस्ट्रेट रा० रा० लाला शिवप्रसाद यांनीं आपल्या प्रियबंधूंचें स्मारक म्हणून बारा हजार रुपये खर्चून हें सुंदर शालागृह उमरावतीकरांस अर्पण केलें आहे. कै० लाला हेमराज हे त्यांचे बंधू होत. बंधुप्रेम अशा सार्वजनिक विद्यामंदिरानें मूर्तस्वरूपाला आणिले ही गोष्ट इतरत्र धनिक उदार लोकांस कित्याप्रमाणें होईल. याच्या वास्तु समारंभाच्या दिवशीं रा० रा० लक्ष्मण गोपाळ देशपांडे यांनीं सुंदर प्रास्ताविक भाषण केलें. त्यावेळेला हीच गोष्ट लोकांच्या त्यांनीं नजरेस आणिली आणि रा० स्टँडनसारखे सद्गृहस्थ ह्या संस्थेच्या रूपानें सदैव वऱ्हाडी मंडळांत गणले जातील असें जेव्हां त्यांनीं सांगितलें तेव्हां सर्वांनी आनंदाचा जयघोष केला आणि लाला शिवप्रसाद यांचे धन्यवाद गाइले.

## वऱ्हाडवृत्त

**हवामान**—उष्णतेचें मान उत्तरोत्तर वाढत आहे. तथापि रात्री फार थंड जातात. प्लेगाची रोगराई अगदीं तुरळक असून कांहीं कांहीं लोक गांवाबाहेर रहाण्यास जात आहेत हा रोग तथापि वाढणार नाहीं अशीं चिन्हें दिसतात.

**वारफंड**—गेल्या फेब्रुवारी अखेर मध्यप्रांत वऱ्हाड मिळून या फंडाची वर्गणी १०८२२९४ रुपये ७ आणे ९ पै जमली आहे. आणि त्या पैकीं फक्त २७१२८६ रुपये स्थानिक उपयोगाकरितां म्हणून ठेऊन बाकीची बहुतेक रकम दिल्लीच्या सेंट्रल कमिटीकडे पाठविण्यांत आली आहे.

प्रांतिक को आपरेटिव्ह मंडळाची सभा जबलपूरला या इस्टरच्या सुट्टींत असून त्या निमित्त आकोला, उमरावती वगैरे ठिकाणाहून कांहीं अग्रणी लोक गेले आहेत.


# Oriental Government security Life Assurance Co., Ltd

ESTABLISHED 1874.

HEAD OFFICE, BOMBAY. R. PATERSON BROWN MANAGER.
THE LEADING INDIAN LIFE ASSURANCE COMPANY

## FUNDS 4 CRORES.

INVESTITED IN GOVERNMENT SECURITIES AND MUNICIPAL AND PORT TRUST BOUNDS.

## Quinquennial Record of Progress.

| Year. | No. of Polices in force. | Extra Assunces. |
|---|---|---|
| | Rs | Rs. |
| 1888 | 8668 | 2,63,38 000 |
| 1893 | 17,657 | 4 68,36,090 |
| 1898 | 28,516 | 6 81,27,774 |
| 1903 | 40,390 | 8 47,06,108 |
| 1908 | 52,168 | 10,12,93,883 |
| 1913 | 62 097 | 12,36,79,510 |

| Year. | Annua Income. | Total Assets. |
|---|---|---|
| | Rs. | Rs. |
| 18883 | 1148,642 | 36 38,694 |
| 189 | 21,16,549 | 80 05,818 |
| [illegible]3 | 31,36,421 | 1,40,32356 |
| 1908 | [illegible],07, 09 | 2,10,[illegible]5,947 |
| 19[illegible] | 535,55,639 | 3,22,79,991 |
| 1913 | 69,44 69. | 4,[illegible]1,61,889 |

## RECORD BONUS

*The Bonus declared for the last triennium constitutes a record.*

IMMEDIATE PAYMENT OF CLAIMS AFTER PROOF OF DEATH and TITLE. THE RATES ARE BASED ON ACTUAL INDIAN EXPERIDNCE AND ARE VERY LOW.

*Extract from report made npon the Company's position as at 31st December 1912, by Mr. Thomas WALLACE, Fellow of the institute of Aciuaries, London*

" At each of the last three Valuations the Reserves of the Compan have been calculated on an increasingly stringent basis. On this occasion there has been a further addition to the reserves and the financial position of the Company has been further strengthened. The resouaces of the Company are now so ample that the security which they afford is undoubted and Policyholders and Shareholders alike may confidently forward to a continuation of prosperity in the future."

Do not delay in applying for Insurance—delays are dangerous. The Oriental is the leading Indian Life Assurance Company. Providing the Policy holders with a absolute security and possessing all the important factors essentia n a first class office it commands the full confidence of the public.

INFLUENTIAL AND ENERGETIC AGENTS WANTED. TERMS LIBERAL
Full particulars, prospectus and prosposal forms on application to:—

**M. deSOUZA,**
CHIEF AGENT,
*C.P. Berar & Khandesh,* NagPUr

N. N. 25


हें पत्र आकोला येथें कैलासवासी खंडेराव बाळाजी फडके यांच्या वऱ्हाडसमाचार छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं सदाशिवआश्रमांत छापून प्रसिद्ध केलें

Regd NO N: 150

# वऱ्हाडसमाचार.

Berar Samachar

वर्ष ४९ ] आकोला—सोमवार तारीख १२ माहे एप्रील सन १९१५ ई० [ अंक १४

## वर्गणीचे दर

आकोल्यांतील लोकांस........१ रुपया
बाहेरगांवीं ट. हां. ........२ रुपये
वर्गणी आगाऊच घेण्याची वहिवाट आहे.

## नोटीशीचे दर

दर ओळीस दीड आणा.
हेडिंगच्या दोन ओळी धरल्या जातील
नोटीस सुवाच्य असली पाहिजे.

सूचनाः— गुरुवारच्या आंत येणाऱ्या नोटीसा त्याच आठवड्यांत घेतल्या जातील. यापुढें येणाऱ्या नोटीसास स्पेशल चार्ज पडेल.

### जाहिरात

मुंबई ब्यांकेची सेव्हिंग ब्यांक.

ह्या बँकेंत खालीं दिलेल्या शर्तीवर ठेवी ठेवितां येतात.

कोणत्याही वर्षाचे १ ले जानेवारी आणि ३१ दिसेंबर याच्या दरम्यान एक हजार रुपये पर्यंत पैसा ठेविला जाईल.

ठेवी दोन अथवा अधिक इसमांच्या नांवावर ठेवतां येतील आणि तो पैसा यापैकीं एकास अथवा जास्त इसमांस अगर यापैकीं मयताचे मागें राहील त्यांस काढतां येईल

व्याज दर साल दर शेंकडा तीन रुपयाप्रमाणें दिलें जाईल. व्याजाची आकारणी प्रत्येक महिन्याची जी कनिष्ठ शिल्लक असेल तिजवर केली जाईल. मात्र पांच हजारावरील शिल्लक रकमेस व्याज नाहीं. नियमांच्या प्रती बँकेंत अर्ज केला असतां मिळतील.

मुंबई ब्यांक } J. G. Ridland.
आकोला ९।९।०९ } एजंट

नो. नं २

### केशराचें फूल मुफ्त

पवित्र केशर ।॥=शुद्ध शिलाजीत ॥ असली कस्तूरी २४ मसीरगतिनती ३ खालिस हींग ८= तो० सुंदर कामदार शाल ३ व

३ १/२ + १ १/२ गज ६ शे १०

काश्मीर स्टोर्स श्रीनगर नं० १२

नो० नं० ८

### हिंदुस्थानावर अरिष्ट.

हिंदुस्थानांतील रहिवाशांच्या पाठीस ज्वर व हिंवताप यांचें अरिष्ट सदोदित लागलें आहे पण त्याचा प्रतिकार करण्यास बाटलीवाला यांचें हिंवतापाचें औषध व गोळ्या हे रामबाण आहेत. ताप किंवा शीतज्वर येणारसें वाटतांच हें औषध घ्यावें. किं. १ रु.

बाटलीवाला यांच्या निस्तेज लोकांसाठीं शक्तिकारक गोळ्या

हें औषध घेतल्यानें भागवटा, मेंदूचे श्रम, पौरुषनाश, अशक्तता व क्षयरोगाचें स्वरूप, त्याप्रमाणें अजीर्ण इ. इ. विकार तात्काळ दूर होतात. किं रु. १८.

बाटलीवाला यांचें दंतमंजन.

हें दंतमंजन मायफळाशीं कांहीं इंग्रजी औषधांचा वैद्यकीय रीतीनें मिलाफ करून बनविलें आहे. किं. ०४

बाटलीवाल्याचें गजकर्णावर मलम.

यानें गजकर्ण, कुजली खरूज यांचा विकार एका दिवसांत नाहींसा होतो. किं. ०४

हीं औषधें सर्व औषधी विकणाऱ्या दुकानावर व डॉ. एच. एल. बाटलीवाला जे. पी. मु. वरली लेबोरेटरी दादर, मुंबई यांजकडे मिळतात.

नो० नं० ९

## चांदीचीं भांडीं.

### विकावयाचीं आहेत.

नाशिक येथें तयार केलेलीं सर्व प्रकारचीं सुबक व घाटदार भांडीं आमचेकडे विक्रीस तयार असतात. भाव माफक व्ही. पी. नें अगर रोखीनें पाठ मालाचे खरेपणाबद्दल ग्यारंटी देऊ

पुरुषोत्तम रामचंद्र वैशंपायन
रविवार पेठ नाशिक सिटी.
नो. नं. ४

### ब्रह्मविद्या ग्रंथ रत्नमाला

या मासिकाचा वर्षारंभ माघ शु॰ ९ तिथीपासून वर्षपासून ७२ पानांचें मासिक वा॰ व॰ ८० खर्चासह तीन रुपये. यांत श्रीशंकराचार्य, शंकरानंद, व विद्यारण्य यांचे उपनिषदावरील भाष्य, आत्मपुराण व अनुभूतिप्रकाश हे ग्रंथ क्रमानें मूळ, अन्वय, अर्थ व विवरण यांसह प्रसिद्ध होतात. यांत हल्लीं बृहदारण्यकाचा भाष्यार्थ चालू आहे. मागील दोन वर्षांतील वीस प्रकरणें १० रुपयांस घेऊन तिसऱ्या वर्षीं वर्गणीदार होणारास 'वैशेषिक दर्शन' बक्षीस

सनातन वैदिक धर्माचें, तत्त्वज्ञानाचें व सामाजिक विषयाचें विवेचन करणारें—

### आचार्य

पाक्षिक, दर एकादशीस नियमितपणें प्रसिद्ध होतें. पृष्ठें २४ वा० व० ८० खर्चासह १ रु० ८ आणे वरील मासिक घेणारास फक्त १रु० वरील विषयांशिवाय यांत संस्कृत काव्यें, नाटकें व इतर लहान लहान ग्रंथें यांचाही परामर्ष केला जातो. धर्म संबंधीं प्रश्नांचीं समर्पक उत्तरेंही दिलीं जातात नमुना मागवा.

पत्ता— विष्णुशास्त्री बापट.
२४१ सदाशिव पेठ पुणें.
नो० नं० ३

### अनायासें देवदर्शन.

नोटपेपर्सः— श्रीगजानन, दत्तात्रय मारुती शंकर व नरहरी या पैकीं कोणती ही एक मूर्ती रंगांत दाबून उठाव (एम्बास) छापलेले, १०० प्रेमनाईट नोटपेपर्स व त्याच्या बेताची चौकोनी १०० कव्हरें प्रत्येकी किंमत ०८ व्हीपीनें ०१२ दोन्ही मिळून किंमत रु. १ व्ही. पी. रु० १०६




सर्वत्र एजन्टस् पाहिजेत

पत्ता—बेंद्रे आणि कंपनी पुणेंसिटी

नो. नं. ७

### मुद्दाम अनुभवाकरितां.

दिलखुषमलम— तमाम त्वचा रोगांवर चालणारा— १ मनुष्यापुरतें औषध किं० १॥ आणा. अस्सल कर्पुरार्क— किं० २ आणे केशनाशक अप्रातिम पूड किं. २ आणे कर्णबिंदू — कानाचा विकार १ दिवसांत गुण ३ दिवसांत फायदा होतो. किं० २ आणे मेंथाकार्क किं० १ आणा.

### अनंगविलास.

गोळी. अत्यक धातुस्तंभक व पौष्टिक १ दिवसांत गुण दाखविते, किं० २ आणे "४ गोळ्या" दंतमंजन— ३ दिवसांत गुण किं० २ आणे. विंचवावर प्रातिज्ञेचें औषध क० ८ मनुष्या पुरत्या औषधाची ३ आणे. नेत्रांजन— डोळ्याचे विकारावर— साधारण, काळी, खुपरी, पाणिगळणे, आग यावर किं० २ आणे. दम्यावर— प्रतिज्ञेनें १ दिवसांत गुण देणारे व ७ दिवसांत पूर्ण फायदा देणारे औषध किं० ४ आणे. शीत पित्तामुळें आंगावर गांधी व खाज अतिशय येते त्यावर ३ दिवसांत गुण देणारे किं० २ आणे. उपदंशरिपु— प्रमेह, उपदंश यावर ३ दिवसांत फायदा व ७ दिवसांत पूर्ण गुण देणारे औषध किं० १ रुपया दिलबहार— सुपारी— १ चिमटी विड्यांत घेतांच, अजिर्ण, अमांश यांचा नाश होऊन झाडा साफ होतो, भूक खुलते किं० १ आणा, तंबाखु रंजनवडी— अत्यंत सुवासीक व कडक तंबाखुची गोळी २० किं० २ आणे. निदान ८ आण्याचा माल मागवावा. व टिकिटाचे रूपानें पोस्टेजसह रकम आगाऊ यावी. १ रुपयाचे आरडरीसही अड नाहीं. व्ही. पी. नें पाठवूं.

मुळे एन्ड सन्स नांदुरा.
नो० नं० ९

### इकडे लक्ष द्या.

ताजना पेठेंतील जागा विकणें आहे खालीं सही करणारांच्या मालकीची जागा देवकिसन आईदान ब्यांकेचा मागें दलाल होता त्याचे घरा शेजारीं तीन मजली मोठी हवेली आहे. ज्यांना घेणें असेल त्यांनीं मि० अंबोर स्वदेशी साखरेचे व्यापारी यांना सर्व माहिती विचारणें.

सही
शिवप्रसाद हिरालाल तिवारी
गोरेगांव द० खु०
नो. नं. १२७

### नोटीस

खालीं सही करणार याजकडून नारायण वा॥ हरी कुणबी रा० पळसो ता॰ जि० आकोला

यांसः—

या नोटीसीनें कळविण्यांत येते कीं तुम्हास दिवाणी कामासंबंधानें सहा सात महिन्या पासून मी कुल मुखत्यारपत्र दिलें होतें. परंतु तुम्ही आमचे म्हणण्या प्रमाणें ऐकत नाहीं सबब या नोटीसीद्वारे तुम्हास दिलेले कुल मुखत्यारपत्र रद्द केलें आहे तुम्ही माझे संबधानें कोणताही व्यवहार करूं नये. ही नोटीस दिली ता० ९।४।१५

सही
विठुजी वा॥ राणोजी सरडे रा०
सोरसगांव याची नि० रेघ असे
नो. नं. १२८

### जाहीर नोटीस

खालीं सही करणार यांजकडून तमाम लोक मुक्काम अकोली पळसोंड व माळठाणे

यांसः—

जाहीर करण्यांत येते कीं, आनंदा वा॥ मारुती रा० माळठाणे याचे शेत सर्वे नं० ३७ यातील एकद्वितीयांश हिस्सा आम्ही खरेदी घेतला आहे. यावर कोणाचा हक्कसंबंध असल्यास आठ दिवसाचे आंत आम्हास लेखी कळवावे तसें न कळविल्यास आम्ही खरेदीखत करून घेऊ मग कोणाचेही हक्क संबंधाबद्दल आम्ही

जबाबदार राहणार नाहीं कळावें ता० ४।४।१९

सही
लक्ष्मण केशव जोशी रा०
अडगांव ता० आकोट जि०
आकोला द० खु०

नो. नं. १२९

## नोटीस

नोटीस बेशमी रावजी वा॥ जानजी गवळी पाटील रा० शिंदखेड ता० व जि० आकोला.

यांस:—

खालीं सही करणार इजकडून नोटीस देण्यांत येतें कीं मी तुह्मांस माझे मुलकी वगैरे कामाकरितां कुलमुखत्यार आज अजमासे तीन ३ वर्षे होत आलीं नेमिले आहे. या करितां मी तुह्मास माझे सर्व प्रकारचे कागदपत्र वगैरे व हिशेब ठिशेब संबंधीं सर्व प्रकारचे काम तुमचे स्वाधीन केले होते. आतां मजला तुमचे मुखत्यारीची जरूरी नसल्या वरून या नोटिशीनें कळवितो कीं, माझे सर्व प्रकारचे कागदपत्र आणि आज पर्यंतचा हिशेब वगैरे ही नोटीस पावल्यापासून आठ दिवसाचे आंत शेट गुलाबराय गोविंदराम साहू दुकान ताजनापेठ आकोला यांचे दुकानीं आणून देऊन व हिशेब वगैरे समजाऊन देऊन त्यांचे हातची पावती घेऊन जावी. आणि या नोटिशीचे आधारें आजपासून मी तुह्मास माझ्या कुलमुखत्यारीचे कामावरून दूर केले आहे. तरी आतां या पुढें तुह्मी माझे तर्फे कोणत्याही प्रकारचा व्यवहार करू नये. केल्यास मी जबाबदार नाहीं. तरी वरील मुदतीचे आंत त्यांचे कडेस माझे तुमचे जवळ असलेले कागदपत्र व हिशेब वगैरे न आल्यास मला तुमचेवर कायदेशीर इलाज करणें भाग होईल. तरी असे होऊ नये ह्मणून तुह्मास या नोटिशीनें कळविले आहे. व कदाचीत असे न केल्यास तुह्मी फिर्यादीचाच प्रसंग आणिल्यास त्या संबंधीं व या नोटिशीचा खर्च वगैरे सर्व तुह्मास द्यावा लागेल. कळावें. तारीख ८ माहे एप्रील सन १९१९ इ०

दस्तुर विश्वनाथ माधव तर्टे पी० रा० आकोला.

सही
मनुबाई मर्द सखाराम थोरात
पाटील रा० चिखलगांव
हल्लीं मु० पारखेड
ता० खामगांव जि० बुलढाणा
नि० खुद हातची बांगडी

नो. नं. १३०

## जाहीर नोटीस

सर्व शेटसावकार वगैरे तमाम लोकांस:-

खालीं सही करणार याजकडून कळविण्यांत येते कीं माझा वडील भाऊ विठोबा नयसींग देशमुख रा० निंभ प्रगणें हतगांव ता० मुर्तिजापूर हा फार वृद्ध झाला असल्यामुळें त्याचा वृत्ती ठिकाणावर नाहीं व त्यास पुत्रसंतान नाहीं. आमची उभयतां भावाची जी वडीलोपार्जित स्थावर जंगम मिळकत आहे तिचा वहीवाटदार मी असोन सर्व माझे ताब्यांत आहे. त्यास अन्नवस्त्र मी पुरवित असतो. अलीकडे तो कांहीं लोकांचे नादानें लागुन जिंदगीची अफरा तफर करण्यांत येत आहे असें समजले वरून सर्वांस जाहीर करण्यांत येते कीं त्यांचेर स्वतंत्र रीतीनें कोणी कर्ज दिल्यास अगर मिळकत गहाण ठेविल्यास किंवा शेती बटाईनें अगर पट्यानें वगैरे कोणतेही तऱ्हेनें घेतल्यास माझे सही शिवाय तो व्यवहार रद्द असे आणि त्यास मी अगर ही मिळकत जबाबदार राहणार नाहीं.

ता० १।४।१९१९

सही
तानबा वा॥ नयसींग देशमुख
रा० निंभ प्रं० हातगांव
ता० मुर्तिजापूर
नि० हातचा आंगठा

नो० नं० १३१

## नोटीस

रा० बालाराम गोविंदलाल अगरवाले रा० हिवरखेड

यांस

खालीं सही करणार कळवितो कीं तुह्मी मारुती वा॥ मोंढाजी कुणबी धामेडे रा० मालठाणे यानें सोनाजी वा॥ उदेभान ढोकणे रा० अकोली यांस रुपये २००० दोन हजाराचे तारीख १९ फेब्रुआरी सन १९०७ इसवीचे लिहून दिलेले ताबेगहाणखत मयत सोनाजीचा मुलगा गणपत ढोकणे यांजपासून ता० १८।१०।१३ रोजीं बेचन घेतले आहे. त्या ताबेगहाणावरचा हक्क आकोले कोर्टाचा दिवाणी मु० नंबर ३३ सन १९१४ याचा निकाल केल्यावेळीं तुह्मी मारुती मोंढाजीचा वारस आनंदा वा॥ मारुती याजला ता० १०।९।१४ इसवीचे दिलेल्या पावतीवरून सोडून दिला आहे. आह्मी सदरहु ताबेगहाणाच्या शेतापैकीं मालठाणे येथील सर्वे नंबर ३७ यांतील एकद्वितीयांश हिस्सा आनंदा याजजवळून खरेदी घेतला आहे. ही नोटीस पावल्यापासून आठ दिवसाचे आंत तुमचा कांहीं हक्क संबंध राहिला असल्यास लेखी कळवावे. तुमचे कडून तसे न कळल्यास तुमचा कांहीं हक्क संबंध राहिला नाहीं. असें समजून आह्मी खरेदीखत करून घेऊं मग तुमच्या कोणत्याही हक्क संबंधाबद्दल आह्मी जबाबदार राहणार नाहीं. ही नोटीस दिली ता० ४।४।१९१९

सही
लक्ष्मण केशव जोशी मुक्काम आडगांव
ता० आकोट जि० आकोला
दस्तुर खुद

नो० नं० १३२

## नोटीस

नोटीस बेशमी विठोबा वा॥ नयसींग दे० रा० निंभ

यांसी:-

नोटीस देणार तानबा वा॥ नयसींग देशमुख रा० निंभ ता० मुर्तिजापूर यांजकडून नोटीस देण्यात येते कीं तुमचा हल्लीं वृद्धाप काळ फार झाला आहे. तुमची वृत्ती ठिकाणावर राहत नाहीं. तुह्मांस पुत्रसंतान नाहीं. तुह्मी आह्मी एकत्र राहत असोन सर्व जिंदगीची वहिवाट मजकडे आहे. तुह्मी फक्त आतां स्वस्थ बसून आपला उदर निर्वाह चालवावा परंतु तसे न करतां कांहीं लोकांचे नादीं लागून तुह्मी जिंदगी संबंधी कांहीं उलाढाली करणार तेव्हां तसे करण्याचा तुह्मांस एकट्यास अधिकार नाहीं. तुह्मी मिळकत कोणास खरेदी अगर गहाण वगैरे कोणतेही रीतीनें लिहून दिल्यास त्याजबद्दल मी व ती इस्टेट जबाबदार नाहीं. जिंदगी ही वडीलोपार्जितची आहे करितां या नोटीसीनें तुह्मास जाहीर केलें आहे ता० १।४।१९

सही
तानबा वा॥ नयसींग देशमुख
रा० निंभ प्र० हातगांव
ता० मुर्तिजापूर नि० आंगठा

नो० नं० १३३

## नोटीस

नोटीस बेशमी गुजाई मर्द जानु बारी असवार व रामु वा॥ माहादाजी बारी असवार रा० आकोट आंबोडा वेस

यांसी:—

नोटीस देणार राघो वा॥ महादाजी बारी असवार रा० अडगांव खाड्याचे ता० दर्यापूर यासी नोटीस देतो ऐसाजे तुह्मी आह्मी पुतणे व भाऊ असे आहोत, वडीलोपार्जित शेत खुदावतपूर ना० आकोट येथील सर्वे नंबर २२ एकर २० २६ आकार रु० १० आठ आणे याचें खातें जानु याच नावें असून जानु हल्लीं ४ महिन्यापूर्वी मरण पावला आहे, सदरहु शेतांत माझा एक चतुर्थांश हिस्सा पूर्वीपासुन असून त्याचे उत्पन्न मला मिळत आहे. खात्याचे वर्ग मुबादल्याचे चौकशी अद्यापी होणें आहे. असें असतां तुह्मी दोघांनीं सदरहु शेत गहाण ठेविले त्यास सुमारें १ महिना झाला. वरून तुह्मास नोटिसीनें कळवितों कीं, सालीमशेत तुह्मास गहाण ठेवण्याचा अधिकार नाहीं. व गहाण ठेवण्याचें कारण ही आपणांस नव्हते. तुह्मास नोटीस पावल्यापासून ८ दिवसाचे आंत माझा एक चतुर्थांश हिस्सा गहाणांतून खुला करून द्यावा. या पुढें मी आपला हिस्सा अलग वाहण्याचें करीत आहे. मुदतींत निकाल न केल्यास तुमचेवर विश्वासघाताबद्दल फौजदारी व गहाण सोडविण्याबद्दल दिवाणीत दावा करावा लागेल. हें खुप समजावें. नोटिसीचा खर्च व दाव्याचा खर्च तुमचेपासून घेतला जाईल. ही नोटीस दिली ता० ६।४।१९१९ ई०

दस्तुर नारायण वामन रा० आकोला.

सही
राघो वा॥ महादाजी बारी असवार
निशाणी खुद अंगठा

नो० नं० १३४

## नोटीस

नथु वा॥ सखाराम बारूकार रा० झेलपूर ता० आकोला

यांस:—

खालीं सही करणार अशी नोटीस देते कीं तूं माझा लग्नाचा नवरा असून तूं आणि तुझा वडील भाऊ रुस्तम एकठिकाणीं राहतात मी तुझे घरीं नांदण्यास आलीं ह्मणजे तुझा वडील भाऊ रुस्तम यांचेपासून मला वारंवार त्यांचेकडून जो त्रास होतो तो मला उघडपणें सांगता येत नाहीं व त्या त्रासामुळें तुझे घरीं राहण्याची माझी हिंम्मत नाहीं, त्यामुळें व त्रास न सोसल्यामुळें तुला सोडून मला आपल्या आईबापाचे घरीं येऊन राहणे मला भाग पडले या साठीं यानोटिसीनें तुला मी असे कळविते कीं, तुला संसार करावा अशी तरी इच्छा असल्यास तूं तुझा भाऊ रुस्तम यास सोडून त्याचे मध्यें एक ठिकाणीं न राहतां निराळे घर करून स्वतंत्र वेगळे रहावे. तसे झाले ह्मणजे तुझेघरीं येऊन राहण्यास व नांदण्यास मी कबूल आहे. तरी एक महिन्याचे आंत निराळे घर करून तेथें तूं मला घेऊन जावे तसे तुझे कडून न झाल्यास आईबापाचे घरीं गेल्या दिवसापासून व पुढें माझे अन्नवस्त्राची दाद योग्य कोर्टाच्या द्वारें मागणे मला भाग पडेल. तसे होण्याचा प्रसंग येऊं नये ह्मणून आगाऊ या नोटीसानें तुला कळविले आहे कळावे. ता० ६।४।१९.

सही
सेवंती मर्द नथु बारुकार
नि० हातची बांगडी

नो० नं० १३५

## नोटीस

नोटीस बेशमी महमद उसमान वा॥ शेकचांद रा० कारंजा ता० मुर्तिजापुर

यांस:—

खालीं सही करणार यांजकडून नोटीस देण्यांत येते कीं ता० ६।६।१२ रजिष्टर झालेले कबुलायती वरून कबजे काळी उर्फ कारंजा तालुका मुर्तिजापूर येथील शेत सर्वे नंबर १६० एकर २ गुंठे ४ आकार रुपये ६ हे सालीम पांच वर्षांकरितां तुमचे ताब्यांत आहे. तेच शेत तारीख १४।३।१९१४ चे रजिष्टर झालेले खरेदीखतावरून कारंजा येथील रामभुनी बाबा या नांवचे संस्थानचे शिष्य पांडुरंगाचार्य यांस मी विकले आहे. सदरहु खरेदीखता वरून सदरहु शेताचे ते मालक आहेत. सदरहू शेतावरील सर्व माझी मालकी त्यांचे कडेस गेली आहे. दरसाल स्वामित्वाची रकम तुमचे पासून घेण्याचा हक्क त्यांचा आहे. त्यास देत जावें. सदरहू कबुलायतीतील सर्व शर्तीं संबंधानें तुह्मी सदरहू संस्थानास जबाबदार आहां.

कळावे. ता० ८।४।१९ मु० आकोला
द० विष्णु प्रभुराम पेनशनर आकोला.

सही
जनार्दन बाळकृष्ण रा०
निबारमुडे कारंजा

नो० नं० १३६ द० खु०

## जाहीर नोटीस

परम पुज्य रामजी बा। मसाजी माळी अडनांव राउत रा० क० रिसोडे ता० वाशीम जि० आकोला.

यांस:—

खाली सही करणार इमकडून नोटीस देण्यांत येते कीं, अममास बारा वर्षांवर दिवस होऊन गेले तुमचेशीं माझें लग्न झालें आहे त्या दिवसापासून तुम्ही माझी मुळींच ने आण केली नाहीं. हल्ली वयांत येऊनही ४।५ वर्षे झालीं आहेत. अझून ही तुम्ही मजला आपले घरीं नेत नाहीं. व दुसरे रांडेचे नादीं लागून मजला टाकून दिलें त्यामुळें माझा संसार व्यर्थ चालला आहे मी अज्ञान असे पर्यंत माझे बापानें मजला पोसले मी सज्ञान झाले पासून माझे बापातर्फे मी लोकांचे तीनशे रुपये ३०० कर्ज काढून खाल्लें आहे. आतां मजला कोणी कर्जही देत नाहीं. करितां ही जाहीर नोटीस तुम्हांस केली आहे तरी सदहू नोटीस वर्तमान पत्रांतून प्रसिद्ध होईल. त्या तारखे पासून एक महिन्याचे आंत मी माझे बापातर्फे काढलेले कर्ज देऊन टाकावे व मजला आपले घरीं घेऊन जावें मी नांदण्यास तयार आहे. खरोखर पाहिले असतां ज्या अर्थी बारा वर्षांपासून तुम्ही मजला आपलें घरीं नेलें नाहीं, त्या अर्थी तुमचा मजवर कोणत्याही प्रकारचा मुळींच हक्क राहिला नाहीं. परंतु दोन्ही कुळांचा स्वाभिमान राखण्या करितां ही नोटीस तुम्हांस केली आहे. तरी वर लिहिलेल्या प्रमाणें मुदतींत तुमचेकडून घडून न आल्यास हीच फारकत समजून मी दुसरा पाट करीन. मग तुमचा माझेवर कोणत्याही प्रकारचा हक्क चालणार नाहीं. या नोटीसीचा सर्व खर्च व पुढें लागणारा खर्च तुमचेवर आहे. कळावें. ता० म० द० रंगनाथ तुकाराम. ता० ४।४।१५

सही

कृष्णाबाई वर्द रामजी राउत

रा० रिसोड जि० खुद

बांगडी

नो० नं० १३७

## जाहिरात

मी रामदयाळ छेटुराम मैसरी मारवाडी दुकान शेलगांव देशमुख ता० मेहकर जि० बुलढाणें.

जाहिरातीनें कळवितो की मी बुलढाणे कचेरींत ता० १६।१२।१४ इ० रोजीं गेलो असून परत येते वेळेस रात्रीचा प्रवास करितांना गाडींत जमाखर्चाच्या वह्याचे दप्तर होतें त्याची गांठ बरोबर बांधल्या गेली नसल्यानें तें सुटल्याचे दुसरे दिवशीं दिसले असतां त्यांत वह्या तपासतां समंत १९६८ सालच्या वह्या मारवाडी लिपीत लिहिलेल्या खातें व नकल अशा गमाविल्या गेल्या. त्या रस्त्यांत कोठेंतरी पडल्या; म्हणून कळवितों कीं कोणास सदहू वह्या सांपडल्या असतील तो इसम आम्हांस कळवून वह्या आणून देईल तर त्यास मी १० दहा रु० इनाम देईन. व त्याचे फार आभार मानता येतील.

सही

रामदयाल छोटुराम मारवाडी

शेलगांव द० खुद

नो० नं० १३८


# वऱ्हाडसमाचार

मिति चैत्र वद्य १३ शके १८३७


## न्याय खात्यांतील सुधारणा.

आपल्या प्रजेला चांगला न्याय देणें हें राजाच्या मुख्य कर्तव्यापैकीं एक कर्तव्य मानलें जातें. न्यायासनावर बसणारे अधिकारी कर्तव्यदक्ष निःपक्षपाती व सत्यान्वेषी असावे लागतात हें काम अतिशय नाजुक व अतिशय महत्वाचें असल्यामुळें तें करावयास नेमलीं जाणारीं माणसें ही तशींच लायक असावीं लागतात. आपणास यथायोग्य न्याय मिळत नाहीं, अशी जर प्रजेची एकदां समजूत झाली तर जिकडे तिकडे असंतोष माजून अनेक तऱ्हेची अनर्थ परंपरा सुरू होण्याचा फार संभव असतो. न्यायमंदिरांत प्रवेश करतांना सत् पक्षाचा जय होईल अशी प्रत्येकाला मनोमय साक्ष पटणें फार जरूर असतें. सत्य आणि असत्य यांचें पुष्कळ वेळां कोर्टांत येणाऱ्या खटल्यांत इतकें बेमालूम तऱ्हेनें मिश्रण झालेलें असतें कीं, त्यांतून सत्य कोणतें हें धुंडाळून काढणें फार मुष्किलीचें होतें; व अशा वेळेस खरा न्याय देणें फार कठिण असतें. पक्षकार व त्यांचे साक्षीदार हे जें काय सांगतील त्यावरच न्यायाचा निकाल अवलंबून असतो व हे लोक कितीशी सत्याची चाड बाळगणारे असतात ही गोष्ट ज्यांना या कामाचा थोडासा तरी अनुभव असेल त्यांना निराळी सांगावयास नको. सारांश न्याय करण्याचें काम अत्यंत बिकट व जोखमीचें असून तें चोख रितीनें पार पाडणें म्हणजे न्यायाधिशाला मानसिक परिश्रम किती करावे लागत असतील याची बरोबर कल्पना होणें फार कठीण आहे. ज्या मानानें आपण काम करतों त्या मानानें कामाचा मोबदला आपणास मिळावा ही इच्छा साधारणपणें प्रत्येक मनुष्याच्या अन्तःकरणात जागृत असते.

या प्रांतांत न्याय खात्यांतील लोकांस दिलें जाणारें वेतन कमी आहे ही गोष्ट न्याय खात्याचे मुख्य अधिकारी सर हेन्री ड्रेक ब्रॉकमन याच्या नजरेस आल्याबरोबर त्यांनीं या बाबतींत बरीच मेहनत घेतली व ईश्वर कृपेनें ती फलद्रूपही झाली याबद्दल त्यांचें मनःपूर्वक अभिनंदन करणें जरूर आहे. साहेब मजकुरानीं आपल्या खात्यांतील इष्ट सुधारणांचा एक मसुदा तयार करून तो स्थानिक सरकारा मार्फत हिंदुस्थानचे स्टेट सेक्रेटरी साहेब यांजकडे पाठविला, व त्याला स्टेट सेक्रेटरी साहेबांची मंजुरी मिळाली ही खरोखर आनंदाची गोष्ट होय. पब्लिक सर्व्हिस कमिशन नेमण्यांत आल्यावर बऱ्याच लोकांत असें वाटूं लागलें होतें कीं, या प्रांतांतील न्याय खात्यांतील लोकांचे पगार वाढविणें व इतर बाबतींत आवश्यक असलेल्या सुधारणा करण्याचें काम कमिशनच्या रिपोर्टावर अवलंबून राहील; व तसें झाले म्हणजे सुधारणा होण्यास फार विलंब लागेल परंतु तसें कांहींएक न होतां सर हेन्री ड्रेक ब्रॉकमन याची योजना (स्कीम) स्थानिक सरकार व स्टेट सेक्रेटरी साहेब यांना पसंत पडून या योजनेस जरूर असणारी मंजुरी स्टेट सेक्रेटरी साहेबांकडून मिळाली याबद्दल न्यायखात्यांत काम करणारे लोक व न्याय मंदिराचा आश्रय करणारे प्रजाजन हे तिघांचेही सारखेच ऋणी आहेत.

वर निर्दिष्ट केलेल्या न्याय खात्यांतील सुधारणा मुख्यत्वें करून खालील प्रमाणें आहेत. आतांपर्यंत या प्रांतांत चालू असलेली डिव्हिजनल आणि सेशन्स जज्जेस व सिव्हिल डिस्ट्रिक्ट जज्जेस नेमण्याची पद्धत बंद करण्यांत येऊन त्यांच्या ऐवजीं वऱ्हाडांत सुरू असलेली डिस्ट्रिक्ट व सेशन्स जज्जेस नेमण्याची पद्धत सुरू करण्यांत येईल. मध्य प्रांताचे नऊ जिल्हे करण्यांत येतील. व वऱ्हाडचे दोन जिल्हे मिळून एकंदर ११ जागांवर डिस्ट्रिक्ट आणि सेशन्स जज्जेस यांच्या नेमणुका करण्यात येतील. त्याच प्रमाणें लिगल रिमेंब्रन्सरची जागा जी आज पर्यंत कायम नव्हती ती आतां कायम करण्यांत येईल. म्हणजे आतां यापुढें न्याय खात्यात एकंदर १३ वरिष्ठ दर्जाच्या जागा करण्यांत आल्या आहेत. व त्यांचे पगार खालील प्रमाणें आहेत.

| | | | |
|---|---|---|---|
| दरमहिना | २७५० रुपयांची | एक | जागा |
| | २५०० रुपयांच्या | २ | जागा |
| | २२५० रुपयांच्या | ३ | जागा |
| | १८०० रुपयांच्या | ६ | जागा |

इंडीयन सिव्हिल सर्व्हिस ची परिक्षा पास झालेल्या लोकांना न्यायखात्यात काम करण्याचें शिक्षण मिळावें या हेतूनें त्यांच्या करतां चार ४ सब जज्जेस च्या जागा राखून ठेवण्यांत येतील. या पैकीं दोन जागेचा पगार दरमहा १००० रुपये राहील व दुसऱ्या दोन जागांचा पगार दरमहा ८०० रुपये राहील. वर नमूद केलेल्या वरिष्ठ दर्जाच्या १२ जागा फक्त इंडीयन सिव्हिल सर्व्हिस ची परिक्षा पास झालेल्या लोकां करतांच आहेत हें विसरतां कामा नये. वर सांगण्यांत आलेंच आहे कीं हल्लीं चालू असलेली सिव्हिल डिस्ट्रिक्ट जज्जेस नेमण्याची पद्धत बंद करण्यांत येईल. हल्लीं या जागांवर काम करित असलेल्या लोकां करितां जागा पाहिजेत म्हणून सब जज्जेसच्या जागा वाढविण्यांत येऊन त्या जागांचे पगारही वाढविण्यांत येणार आहेत. हल्लीं सब जज्जेसच्या जागा फक्त ३४ आहेत. त्या वाढवून ४६ करण्यांत येतील. त्याच प्रमाणें हल्लींच्या सब जज्जेसच्या जागांचे पगार ३०० आणि ४०० जे होते ते वाढविण्यांत आले आहेत तें येणें प्रमाणें

| ग्रेड | दरमहा पगार रु० | जागा |
|---|---|---|
| १ | ८०० | २ |
| २ | ७०० | ३ |
| ३ | ६०० | ५ |
| ४ | ५०० | ११ |
| ५ | ४०० | १२ |
| ६ | ३०० | १३ |

हल्लीं मुन्सफांच्या एकंदर ७४ जागा आहेत. या जागा ४ ग्रेडस् मध्यें विभागल्या जाऊन त्यांचे पगार दरमहा २५०, २००, १७५, व १५० असे आहेत. नवीन योजना अमलांत आल्यावर मुन्सफांच्या जागा ७२ करण्यांत येतील. व त्या ३ ग्रेडस् मध्यें पुढील प्रमाणें वाटल्या जातील.

| ग्रेड | दरमहा पगार रु० | जागा |
|---|---|---|
| १ | २५० | १५ |
| २ | २०० | २५ |
| ३ | १७५ | ३२ |

या नवीन सुधारणा अमलांत आणावयाच्या म्हणजे सालीना १९२००० रुपये न्याय खात्या कडे ज्यास्त खर्च करावे लागतील. या सालचें खर्चाचें अंदाजपत्रक तयार होण्यापूर्वी स्टेट सेक्रेटरी साहेबाची मंजुरी मिळाली नाहीं सबब चालू सालच्या अंदाजपत्रकांत या ज्यादा खर्चाचा समावेश केलेला नाहीं. मंजुरी मिळाल्यावर बजेटांत या खर्चाचा समावेश करतां आला असता परंतु इतक्यांत लढाई उपस्थित झाल्यामुळें पैशाची बरीच ओढाताण झाली आहे सबब चालू सालीं नवीन योजनेप्रमाणें सर्व कारभार सुरू करतां येणार नाहीं हें उघडच आहे.

## गुन्हा करणारीं मुलें.

मिसेस आनी बिझांट यानीं हेरल्ड ऑफ दि स्टार' नांवाच्या मासिकाच्या गेल्या फेब्रुवारी महिन्याच्या अंकांत मुलानीं गुन्हा केल्यास त्यांना इतर सामान्य कैद्यां प्रमाणें न वागवितां त्यांची स्थिती सुधारण्या करितां कोठें कोठें व कस कसे प्रयत्न चालले आहेत यावर एक लेख लिहिला आहे. या बाबतींत आमच्या देशात सुधारणा होण्यास बरीच जागा आहे असें वाटल्यावरून वरील लेखाचा मथितार्थ पुढें दिला आहे.

मूल जन्मास येतें त्या वेळेस त्याचें मन स्वच्छ पांढऱ्या कागदा प्रमाणें अगदीं संस्काररहित असतें. किंवा पूर्व जन्मीचे संस्कार त्याच्या मनावर असतात हा मानस शास्त्रांतील एक मोठा बिकट व वादग्रस्त प्रश्न आहे. हा प्रश्न बाजूला ठेवला तरी एवढी गोष्ट कोणालाही नाकबूल करतां येणार नाहीं कीं एकाच आई व बापाची व एकाच परिस्थितींत वाढलेलीं मुलें भिन्न भिन्न स्वभावाचीं व केव्हां केव्हां विरुद्ध स्वभावाचीं निपजतात. "स्वभावो दुरतिक्रमः" या वाक्याचीं प्रत्यंतरें प्रत्येक मनुष्यास पावलोपावलीं येत असतात. हें सर्व जरी खरें असलें तरी उलट पक्षीं हें ही निर्विवाद आहे कीं शिक्षण, संगत वगैरे बाह्य परिस्थितीचा परिणाम मनुष्याच्या मनावर घडतो. व मूळ स्वभाव जरी अगदीं बदलून येत नाहीं तरी त्याला पुष्कळ आळा

पडतो. याच तत्त्वांचा अवलंब करून गुन्हेगार तरुण मुलांमध्यें आश्चर्यकारक सुधारणा करण्यांत आल्या आहेत. त्यांना सुधारण्यास कांहींच प्रयत्न जर केला नसता तर हींच मुलें पुढें कायमचेच गुन्हे करून पोट भरणारीं निपजलीं असतीं परंतु योग्य रीतीनें प्रयत्न झाल्यामुळें हीच मुलें पुढें उद्योग करून पोट भरणारीं व प्रामाणिक आणि शांतताप्रिय नागरिक बनलीं आहेत

पूर्वीच्याकाळीं सर्वत्र अशी स्थिती असल्याचें आढळून येते कीं प्रथमच गुन्हा केलेल्या लहान व तरुण मुलांना इतर कैद्यांबरोबर एकाच तुरुंगांत ठेवण्यांत येत असे. याचा परिणाम अर्थातच असा होत असे कीं पक्या बिलंदर गुन्हेगारांच्या सहवासांत सर्व दिवस गेल्यानें हीं मुलें तुरुगांतून सुटल्यावर ही त्यांची प्रवृत्ति गुन्हेकरण्याकडेच होत असे व अशा रीतीनें त्यांचें आयुष्य सर्व व्यर्थ जात असे. ही शोचनिय स्थिति सुधारण्याचा प्रयत्न प्रथम अमेरिकेंतील युनायटेड स्टेटमध्यें न्यायमूर्ति बेंजामिन लिंडसे यांनीं केला. तरुण गुन्हेगारांच्या चौकशी करतां स्वतंत्र कोर्टें अमेरिकेंत सर्वत्र स्थापन करण्यांत आलीं आहेत. त्यांचे उत्पादक हेच साहेब होत. एखाद्या मुलाला चौकशी करतां यांच्या पुढें उभे करण्यांत आलें कीं ते त्याला एका खोलींत घेऊन जात व त्याच्याशीं गोड बोलून व त्याला प्रेमळ उपदेशाच्या गोष्टी सांगून त्याच्याशीं स्नेहभाव स्थापन करीत व त्या मुलाचें मन वळवून त्याला सन्मार्गाला लावण्याचा प्रयत्न करीत व त्यांत त्यांना यशही मिळे. प्रेमळ वर्तणुकीचा असा चांगला परिणाम होतो ही गोष्ट निदर्शनास आल्यावर पुढें “ उमेदवारीच्या काळाची ” पद्धत सुरू करण्यांत आली. ही पद्धत ह्मणजे अशी कीं गुन्हे केलेल्या मुलाला शिक्षा सुनावली जात असे. परंतु ती तात्काळ अमलांत आणत नसत. कांहीं कालपर्यंत त्याला स्वइच्छेनें पालक होण्यास तयार असणाऱ्या गृहस्थाच्या हवालीं करीत व तेथें चांगलें वर्तन ठेवीपर्यंत त्याला ठेवण्यांत येत असे. पालकही त्याच्याशीं ममतेनें वागून त्याला सरळ मार्गाला लावण्याचा प्रयत्न करी. स्वइच्छेनें पालक होण्यास तयार असणारे गृहस्थ नेहमीं मिळणें कठीण पडे. सबब या कामावर निराळे कामगार नेमण्यांत आले होते त्यांच्या स्वाधीन हीं मुलें केलीं जात असत.

अमेरिकेंत गुन्हा केलेल्या मुलांना ठेवण्या करितां प्रातिबंधन गृहें “ डिटेन्शन् होम्स ” स्थापण्यांत आलीं होतीं. व तेथें त्यांना अशा तऱ्हेनें वागविण्यांत येत असे कीं त्यांना आपण घरीं आहों— तुरुगांत नव्हे— असें वाटावें. व अशा तऱ्हेनें चांगल्या परिस्थितींत वाढलेले हे तरुण कैदी पुढें उत्तम नागरिक बनले असें आढळून आलें. शेवटीं १९१३ मध्यें युनायटेड स्टेट्स् मध्यें एक कायदा पास करण्यांत आला. या कायद्यान्वयें तरुण गुन्हेगारांच्या चौकशी करतां स्थापित झालेल्या कोर्टांत आलेला प्रत्येक मुलगा एकवीस वर्षांचा होई पर्यंत व प्रत्येक मुलगी अठरा वर्षांची होई पर्यंत कोर्टाची वार्ड रहावीं अशी योजना केलेली आहे. व “ गुन्हेगार मुलगा ” या शब्दाची व्याख्या इतकी व्यापक केली आहे कीं त्यांत प्रत्यक्ष गुन्हा केलेल्या मुलांचाच नव्हे तर कोणत्याही रीतीनें दुर्वर्तन करणारीं मुलें इतकेंच नव्हे तर आईबाप किंवा पालक ज्यांचा योग्य प्रतिपाळ करीत नाहींत अशांचा ही समावेश व्हावा. आपल्या वस्तींत असा एखादा मुलगा असल्याबद्दल कोणाही सभ्यगृहस्थानें अर्ज केल्यास कोर्टामार्फत या अर्जाची चौकशी होऊन मुलाला ताब्यांत घेण्याची व्यवस्था होते व देहांत शासन ज्या गुन्ह्याला असा गुन्हा मुलानें केला असेल बरेच फक्त त्याला तुरुंगांत पाठविण्यांत येतें.

सन १९१२ सालीं बेलजममध्यें एक कायदा पास होऊन तरुण गुन्हेगारांच्या चौकशीचीं कोर्टें स्थापन करण्यांत आलीं. सन १९१३ मध्यें ब्रुसेल्स शहरीं सर्व युरोपियन राष्ट्रांच्या प्रतिनिधींची एक सभा गुन्हा केलेल्या तरुण मुलांना वागविण्याची उत्तम तऱ्हा कोणती या विषयाचा विचार करण्याकरितां भरली होती. त्या सभेंत झालेल्या वादविवादांत एक गोष्ट निष्पन्न झाली ती अशी कीं तरुण गुन्हेगारांच्या चौकशीचीं कोर्टें पूर्णपणें यशस्वी झालीं आहेत असें ठरलें. वरील वादाविवादात दुसरी एक गोष्ट निष्पन्न झाली ती ही कीं गुन्हे करण्याची प्रवृति होण्यास शरीर प्रकृतींत कांहीं तरी असलेला दोष कारणीभूत होतो असें ठरलें. असो वरील विवेचनावरून निरनिराळ्या प्रांतांतून तरुण गुन्हेगारांची स्थिति सुधारण्यास कसकसे प्रयत्न होत आहेत हें कळून येईल.

या बाबतींत आमच्या देशांतही बरीचशी कामगिरी होणें जरूर आहे. हल्लींच्या क्रिमिनल प्रोसीजर कोडचे ५६२ वे कलम याच संबंधाचें आहे हें खरें, परंतु तें फार अपुरें असल्याकारणानें त्यापासून फारसा फायदा होत नाहीं. हें कलम फक्त कांहीं विशिष्ट गुन्हे केलेल्या मुलांसच लागूं पडते व जामिनावर जरी मुलें सोडण्यांत येतात तरी जामिनाचा व कोर्टाचा कांहींच संबंध नसल्याकारणानें जामीन राहिलेला इसम मुलास कोणत्या रीतीनें वागवित आहे हे समजण्याचा कांहींच मार्ग नाहीं मुंबईंत एक मुलांकरितां “ रिफार्मेटरी ” आहे. तथापी तेवढ्यानें सर्व काम भागत नाहीं. अमेरिकेंत हल्लीं या बाबतींत जी व्यवस्था ती किंवा तशा तऱ्हेची व्यवस्था येथें असणें अत्यंत जरूरीचें आहे. तसें झाल्यास कित्येक तरुण मुलें सन्मार्गाला लागतील यांतिळ मात्र संदेह नाहीं. गुन्हेगार जितके कमी असतील तितकी प्रजेला शांतता ज्यास्त मिळेल व सरकारचेंही शांतताप्रिय नागरीक ज्यास्त असण्यांत हितच आहे. तरी या सर्व गोष्टींचा विचार करून या बाबतींत शक्य तो प्रयत्न सरकारनें करावा अशी सरकारास आमची नम्र सूचना आहे.

## महायुद्ध

पूर्व रण क्षेत्रांत कार्पेथियनच्या भागांत रशियानें उत्तम विजयश्री मिळविली आहे आणि पश्चिमेकडील रणक्षेत्रांतील संयुक्त सैन्याचें पाऊल उत्तरोत्तर पुढें असून जर्मनी अधिक जेरीला येत चालला आहे. आफ्रिका, दक्षिणअमेरिका व पर्शिया यांच्या बाजूसही लढाया चालू आहेत आणि त्यांतही आपलें पाऊल नेटानें जयश्री कडेच जात आहे.

## वऱ्हाडवृत्त

**हवामान** — अभ्रें, विजा व पाऊस यांनीं या आठवड्यांत पुष्कळ धांदल उडऊन दिली होती पण आतां पुनः वसंत ऋतु य पुढें उग्र स्वरूप धारण करील असें दिसतें. सध्यां कांहीं कांहीं वृक्षांचा मोहर वातावरण फारच सुवासित करितो. प्लेगची ईति शांत झाल्यासारखीच दिसते.

खान बहादुर माणिकशा रतनजी दस्तूर डिस्टिक्ट जज्ज यांस पाहिले वर्गाची बढती देण्यांत आली आहे हें कळविण्यास फार आनंद वाटतो. या बढती बरोबरच सर डेक ब्राकमन, रा. रा. गोपाळ वामन बापट यांच्याही हक्काचा योग्य विचार करतील तर ते वऱ्हाडच्या मंडळींच्या आदरास विशेष पात्र होतील.

रा० रा० बी० सी० टेलर असि० पोलिस सुपरिंटेंडन्ट यांस खामगांव येथें बदललें ही आनंदाची गोष्ट होय.

रा० रा० कृष्णप्रसाद वर्मा ट्रेझरी आफिसर आकोला यांस २॥ महिन्याची हक्काची रजा देऊन त्यांच्या जागीं रा० रा० बळवंत यादव खोब्कुटे यास यवतमाळाहून आकोल्यास बदलण्यांत आलें.

रा० रा० आर० सी० रिचर्डमन नवे सिव्हिल सर्जन यांस उपरावतीस नेमण्यांत आलें.

## जाहीर नोटीस

रा. रा. दगडचंद गनुलाल आगरवाले दुकान मालेगांव बाजार ता० आकोट पोष्ट मालेगांव बाजार

यांसः—

खालीं सही करणार यांजकडून या जाहिर नोटिशीनें कळविण्यात येते कीं आज मास गेल्या अश्वीनमासीं मी तेल्हारा येथील दवाखान्यात आजारी होतों त्यावेळीं मजला पैशाची जरुर लागल्यामुळें मी माझा भाउ नामे मारुती रोडाजी यांस तुमचेकडे पाठवून तुह्मास तेल्हाऱ्यास बोलाउन आणिले आणि त्या ठिकाणीं मी माझे औषधोपचारासाठीं तुह्मास कर्जाऊ रक्कम मागीतली असतां तुह्मी सांगितलें कीं कांहीं ऐवज ठेविल्याशिवाय देत नाहीं. तर मी त्यावेळीं माझे स्वतः मालकीची सोन्याची सरी वजन दोन वाल कमी तोळे १४ चवदाची शंभर नबरी सोन्याची तुमचे पाशीं गहाण ठेविली आणि तुमचेपासून रु० ३०० तीनशे दरमहा दर शेकडा बारा आणे व्याजाप्रमाणें रकम घेतली सोने गहाण ठेवण्याचे वेळी तुह्मी सांगीतलें कीं येवढ्या मालावर मी रुपये तीनशे देऊं शकत नाहीं यासाठीं तुह्मी मजला रुपये पाउणशेची प्रामेसरी नोट लिहून द्या आणि सोन्यावर रुपये सवा दोनशे ठेवितो तुह्मी आजारी असल्यामुळें प्रामेसरी नोट तुमचें भावाचें नांवानी लिहून घेतों आणि रुपये पुरे करून देतो. या कराराप्रमाणे सर्व व्यवहार झाला गहाणाचे खाते तुह्मी माझे नांवानीं घालावें तर ते माझ्या भावाचे नावांनीं घातले त्यासहि कहीं हरकत नाहीं पुढें गहाणमाल सोडविण्यासाठीं मी गहाण ठेविल्यापासून चार महिन्यानी व्याजसुद्धा रक्कम घेउन प्रामेसरी नोट आणि सरी आणण्यासाठीं रा. गणू पाटील आणि माझा गाडीवान नामे बाळू यास पाठविलें असतां त्यावेळीं तुह्मी सांगितलें कीं तुमची वस्तु मी पेटांत घालुन ठेविल्यामुळें तूर्त निघू शकत नाहीं. यासाठीं तुह्मी आठ चार दिवस सबुर करा मी तुमची वस्तु काढल्यावर तुह्मास इत्तला करीन. त्यास पुष्कळ दिवस झाले. शेवटीं आठ दिवसा पुरता मी स्वतः ता० १९।२।१९१५ रोजीं आलो आणि रु० ४ ठरल्या व्याजां प्रमाणें घ्या असे ह्मणालो तर तुह्मी मजला बरें आहे ह्मणून खाते गहाणाचे काढून दाखविले व ह्मणाले खात्यांत तुमचेकडे २८२ रु० निघतात. तें दरमहा दर शेकडा १॥ दिड रु० प्रमाणें चुकते करा. व प्रामेसरी नोटीचे व्याज दरमहा दर शेकडां १॥ दिड रु० प्रमाणें व्याज आणि मु० रु० ७५ द्या. व तुमची वस्तु घेऊन जा असे सांगितल्यामुळें आह्मास तुमची लबाडी व धोकेबाजी दिसल्यावरून ही नोटीस देणें भाग पडले. तरी तुह्मास या नोटिशीनें कळवितो कीं तुमची रकम ३०० प्रामेशरी नोटी सुद्धां व गहाण माल सुद्धां गहाण ठेवल्या तारखेपासून ते मी रक्कम देण्यास मंडळीस तुमचेकडे पाठविल्याचे तारखे पावेतों ४ चार महिन्याचे दरमहा दर शेकडां बारा आणे व्याजाप्रमाणें सर्व रक्कम आकोला येथें रामचंद्र जानराव मराठे यांचे दुकानीं धरवर ठेवली आहे. तर तुह्मी त्यांचे दुकानीं माझी शंभर नंबरी सोन्याची सरी वजन २ दोन वाल कमी तोळे १४ ची आणि प्रामेसरी नोट रु० ७५ ची आणून द्यावी व रक्कम घेऊन जावी. ४ चार महिन्याचे पुढील व्याज मी देणार नाहीं. कारण तुमचे अडचणीमुळें माझी वस्तु तुमचे जवळ राहिली. मी त्याचेवळीं कोर्टांत गहाण सोडविण्याचा दावा करित हं तो. परंतु तुह्मी या पुढें रकमेस व्याज तुमची वस्तु देई पावेतों घेणार नाहीं. असें अनेकवार तुह्मास गहाण माल सोडवून घेण्यास आलो असतां ह्मणाले ह्मणून तुमचे शद्बावर मी थांबून बसलो. या प्रमाणें आपण न केल्यास मजला कायदेशीर योग्य मार्ग धरणें भाग पडेल. ही नोटीस दिली.

मु० आकोला ता० २७।२।१५

सही

तुळशीराम रोडाजी पा०

रा० भोकर पोष्ट तेल्हारा

नो० नं० १३९

ता० क०— ही नोटीस नजर चुकीनें छापलेल्या मजकुरांत पडल्यामुळें आज उशीरा छापित आहों.

प्रकाशक.

हें पत्र आकोला येथें कैलासवासी खंडेराव बाळाजी फडके यांच्या वऱ्हाडसमाचार छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं सदाशिवाश्रमांत छापून प्रसिद्ध केलें.

Regd NO N.-150

# वऱ्हाडसमाचार.

## Berar Samachar

वर्ष ४९ ] आकोला—सोमवार तारीख २६ माहे एप्रील सन १९१५ ई० [ अंक १६

### वर्गणीचे दर

आकोल्यांतील लोकांस........१ रुपया
बाहेरगांवीं ह. हां. ........ २ रुपये
वर्गणी आगाऊच घेण्याची वहिवाट आहे.

### नोटीशीचें दर

दर ओळीस दीड आणा.
हेडिंगच्या दोन ओळी धरल्या जातील
नोटीस सुवाच्य असली पाहिजे.
सूचनाः— गुरुवारच्या आंत येणाऱ्या नोटीसा त्याच आठवड्यांत घेतल्या जातील. पापुढें येणाऱ्या नोटीसास स्पेशल चार्ज पडेल.

### जाहिरात

**मुंबई ब्यांकेची सेव्हिंग ब्यांक.**

या बँकेंत खालीं दिलेल्या शर्तीवर ठेवी ठेवितां येतात.

कोणत्याही वर्षाचे १ ले जानेवारी आणि ३१ दिसेंबर यांच्या दरम्यान एक हजार रुपये पर्यंत पैसा ठेविता जाईल.

ठेवी दोन अथवा अधिक इसमांच्या नांवावर ठेवता येतील आणि तो पैसा [illegible] प्रत्येक महिन्याची जी कनिष्ठ शिल्लक असेल तिजवर केली जाईल. मात्र पांच हजारावरील शिल्लक रकमेस व्याज नाहीं. नियमांच्या प्रती बँकेंत अर्ज केला असतां मिळतील.

मुंबई ब्यांक आकोला १।९।०९ } J. G. Ridland. एजंट

नो. नं २

### केशराचें फूल मुफ्त

पवित्र केशर ॥।= शुद्ध शिलाजीत ॥ असली कस्तूरी २४ समिरातिनती १ खालिस हींग ८= तो० सुंदर कामदार शाल १ व

१ १/२ → १ १/२ गज १ ते १०

काश्मीर स्टोर्स श्रीनगर नं० १२
नो० नं० ८

### हिंदुस्थानावर अरिष्ट.

हिंदुस्थानांतील रहिवाशांच्या पाठीस ज्वर व इन्फ्लुएन्झा यांचें अरिष्ट लागलें आहे पण त्याचा प्रतिकार करण्यास बाट- लीवाला यांचें हिवतापाचें औषध व गोळ्या हे रामबाण आहेत. ताप किंवा शीतज्वर येणारसें वाटतांच हें औषध घ्यावें. किं. १ रु.

**बाटलीवाला यांच्या निस्तेज लोकांसाठीं शक्तिकारक गोळ्या**

हें औषध घेतल्यानें भागवटा, मेंदूचे श्रम, पौरुषनाश, अशक्तता व क्षयरोगाचें स्वरूप, त्याप्रमाणें अजीर्ण इ. इ. विकार तात्काळ दूर होतात. किं रु. १८८.

**बाटलीवाला यांचें दंतमंजन.**

हें दंतमंजन मायफळाशीं कांहीं इंग्रजी औषधांचा वैद्यकीय रीतीनें मिश्रण करून बनविलें आहे. किं. ०४

**बाटलीवाल्याचें गजकर्णावर मलम.**

यानें गजकर्ण, कुजली, खरूज यांचा विकार एका दिवसांत नाहींसा होतो. किं. ०४

हीं औषधें सर्व औषधी विकणाऱ्या दुकानावर व डॉ. एच. एल. बाटलीवाला जे. पी. मु. वरली लेबोरेटरी दादर, मुंबई यांजकडे मिळतात.

ना० नं० ९

### चांदीचीं भांडीं.

#### विकावयाचीं आहेत.

नाशिक येथें तयार केलेलीं सर्व प्रकारची नवक व घाटदार भांडी आमचेकडे [illegible]

पुरुषोत्तम रायचंद वैशंपायन
रविवार पेठ नाशिक सिटी
नो. नं. ४

### ब्रह्मविद्या ग्रंथ रत्नमाला

या मासिकाचा वर्षारंभ माघ शु० १ तिसऱ्या वर्षापासून ७२ पानांचें मासिक वा० व० ८० खर्चासह तीन रुपये. यांत श्रीशंकराचार्य, शंकरानंद, व विद्यारण्य यांचे उपनिषदावरील भाष्य, आत्मपुराण व अनुभूतिप्रकाश हे ग्रंथ क्रमानें मूळ, अन्वय, अर्थ व विवरण यांसह प्रसिद्ध होतात. यांत हल्ली बृहदारण्यकाचा भाष्यार्थ चालू आहे. मागील दोन वर्षांतील बीस प्रकरणें १० रुपयांस घेऊन तिसऱ्या वर्षी वर्गणीदार होणारास 'वैशेषिक दर्शन' बक्षीस

सनातन वैदिक धर्माचें, तत्त्वज्ञानाचें व सामाजिक विषयांचें विवेचन करणारें—

**आचार्य**

पाक्षिक, दर एकादशीस नियमितपणें प्रसिद्ध होतें. पृष्ठें २४ वा० व० ट० खर्चासह १ रु० ८ आणे वरील मासिक घेणारास फक्त १रु० वरील विषयांशिवाय यांत संस्कृत काव्यें, नाटकें व इतर लहान लहान ग्रंथांचाही परामर्श केला जातो. शर्म [illegible]

प्रश्नाचा [illegible] उत्तरेंही दिलीं जातात नमुना मागवा.

पत्ता— विष्णुशास्त्री बापट.
२४१ सदाशिव पेठ पुणें.
नो० न० ३

### अनायासें देवदर्शन.

नोटपेपर्सः— श्रीगजानन, दत्तात्रय मारुती शंकर व नरहरी या पैकीं कोणती ही एक मूर्ती रंगांत दाबून उठाव (एम्बास) छापलेले, १०० प्रेप्रनाईट नोटपेपर्स व त्यांच्या बेताची चौकोनी १०० कव्हरें प्रत्येकीं किंमत ०८ व्हीपीनें ०१२ दोन्ही मिळून किंमत रु. १ व्ही. पी. रु० १०६




सर्वत्र एजन्टस् पाहिजेत
पत्ता—चंद्र आणि कंपनी पुणेंसिटी
नो नं. ७

### मुद्दाम अनुभव करितां.

[illegible]

कर्णबिंदू — कानाचा विकार १ दिवसांत गुण ३ दिवसांत फायदा होतो. किं० २ आणे ग्रंथाकार्क किं० १ आणा.

### अनंगाविलास.

गोळी. अत्यंत धातुस्तंभक व पौष्टिक १ दिवसांत गुण दाखविते, किं० २ आणे "४ मोत्या" दंतमंजन— ३ दिवसांत गुण किं० २ आणे. विंचवावर प्रातिज्ञेचें औषध क० ८ मनुष्या पुरता औषधाची ३ आणे. नेत्रांजन— डोळ्याचे विकारावर— साधारण काळी, खुपरी, पाणिगळणे, आग यावर किं० २ आणे. दुखाहर— प्रातिज्ञेनें १ दिवसांत गुण देणारे व ७ दिवसांत पूर्ण फायदा देणारे औषध किं० ४ आणे. शीत पित्तामुळें आंगावर गांधी व खाज अतिशय येत त्यावर ३ दिवसांत गुण देणारे किं० २ आणे. उपदंशरिपु— प्रमेह, उपदंश यावर ३ दिवसांत फायदा व ७ दिवसांत पूर्ण गुण देणारे औषध किं० १ रुपया दिलबहार— सुपारी— १ चिमटी खिल्यांत घतांच, अजीर्ण, अमांश यांचा नाश होऊन झाडा साफ होतो, भूक लागते किं० १ आणा, तंबाखु रतनबत्ती— अत्यंत सुवासीक व कडक तंबाखुची गोळी २० किं० २ आणे. निदान ८ आण्याचा माल मागवावा. व टिकिटाचे रुपानें पोस्टेजसह रकम आगाऊ यावी. १ रुपयाचे आरडरीसही अट नाहीं. व्ही. पी. नें पाठवूं.

मुळे एन्ड सन्स नांदुरा.
नो० नं० ९

### इकडे लक्ष द्या.

ताजना पेठेंतील जागा विकणें आहे खालीं सही करणाराच्या मालकीची जागा देवकिसन आईदान ब्यांकेचा मागीं दलाल होता त्याचे घरा शेजारीं तीन मजली मोठी हवेली आहे. ज्यांना घेणें असेल त्यानीं मि० अघोर स्वदेशी साखरेचे व्यापारी यांना सर्व माहिती विचारणें.

सही
शिवप्रसाद हिरालाल तिवारी
गोरेगांव द० खु०
नो. नं. १२७

### जाहिरात

आकोलें येथील जठार पेठेंतील के. रा. रा. शंकरराव मोडोळकर वकील ह्यांचा बंगला विकावयाचा आहे. तरी ज्यांस १९०० रुपयांपेक्षां जास्त किंमतीस तो घ्यावयाची इच्छा असेल त्यानें श्री. रा. रा [illegible] १७ एप्रिल [illegible]

गोविंद दत्तात्रय खडकर
नो. नं. १९०

### नोटीस.

रा० रा गणपतराव रामराव पटवारी रा० चिखलगांव ता० आकोला

यांसः—

खालीं सही करणार वाजकडून तुम्हाला व इतर सर्व लोकांस जाहिरखबर देण्यांत येते कीं

प्रयागी वर्द गणपती } गणपती वा॥ महादाजी } उभयतां राहणार राजंद यांनीं ता० १९।३।११ चें १ हजार रुपयाचें गहाणखत, स्माल काज कोर्टाचे हुकूमनामे व दोनशे रुपयांचा कर्जरोखा यांच्या फेडींत सदर्हू गहाणखतांतील शेती व घर विकत देण्याचा करार ता० १६।४।१९ रोजीं राजंदे येथें वारीच्या दुकानीं केला आहे. एकदोन दिवसांत खरीदीखत होणार इतक्यांत सदर्हू केचे [illegible] तुम्हाला शेती विकणार असल्याचें कळलें. तुम्हाला आमच्या

खरेदीची तोंडी समक्ष मी माझ्या मुखत्यारा मार्फत तहसील कचेरीवर ता० २०।४ १९ रोजीं दिली आहे. या उपर तुम्ही खरिदी घ्याल तर सर्व जोखीम तुम्हावर राहील आणि आमच्या पैशाची व मालकीच्या हक्काची भरपाई तुम्हास करून द्यावी लागेल. तुमच्या सल्यानें दोघे ऋणको आमच्या हुकुमनाम्याची व साध्या रोख्याची रक्कम बुडविण्याच्या इरादांत आहेत. तर तुम्ही स्वतां किंवा दुसऱ्या कोणास पुढें उभे करून शेती व घर विकत घेऊं नये म्हणून ही आगाऊ सूचना दिली आहे.

कळावें. ता० २१।४।१९ ई०

सही.

किसन रामजी पांडव अज्ञान पालन करणार आई पार्वतीबाई राहणार नावंद ता० आकोला.

नो० नं० १४२

## नोटीस

रा० रा० हिरामन वा। भोनाजी बारी ढगे व तुळशी मर्द हिरामन बारी ढगे रा० नळगांव

यांस:-

मी नोटीस देणार गोविंद पुरुषोत्तम पिंप्रीकर रा० नळगांव तुम्हास या लेखा वरून असे कळविले जात आहे कीं तुम्ही आमचे मालकीचे शेत नळगांव प्र० खेल माळी येथील सर्व्हे नं० चे ६९ बागायत करण्यास दरसाल रुपये ७५ प्रमाणें देण्याचे कबूल करून ५ वर्षे मुदतीचा माडेपटा ता० ४।७।१० रोजीं लिहून दिला व नोंदून दिला त्या प्रमाणें तुम्ही त्यांत नागवेल लावली होती. ३ वर्षांचे पैसे दिले व २ दोन वर्षांचे पैसे दिले नाहीं. ५ वर्षांचा करार पुरा झाला आहे. ५ वर्ष पुरे झाल्या बरोबर शेताचा कबजा देण्याबद्दल कबुलायत असून दोन वर्षापासून तुम्ही वेड्या सारखे करीत असलेमुळे तुमचे बायकोनी साल पुरे झाल्या बरोबर पैसे देईल असे कबुल केल्या वरून तिचे कडे आम्ही ठेविले होते नंतर मुदत संपली ह्या जमीनीत नवीन लागवड केली व नागवेल करावी व लागवडीस पैसा माझी कर्जाऊ द्यावा असे ठरून तिनें आमचे पासून रुपये १०० कर्जाऊ घेऊन लागवड केली आहे व पुढें मी तेथे दि त्यानंतर दुसरा माडेपटा दरसाल रुपये १२९ देण्याचे कबूल करून १ वर्ष मुदतीचा माडे पटा तुमचे बायकोनें लिहून दिला आहे. जर या प्रमाणें रुपये आमचे कडून न मिळाल्यास नवीन लागवड केलेले कर्जाऊ पैसे न देतां फक्त २ वर्षांचे पैसे १९० व्याज सुद्धा देऊन पिका सुद्धा जमीन तब्यांत देण्याचे कबुल केले होते त्या प्रमाणें तुमचे कडून पैसे आले नाहीं व शेताचा कबजाही देत नाहीं सबब या नो० वरून असे कळवितो कीं ८ दिवसात पैसे देऊन पावती घ्यावी. हे नाहीं शेत १९० रुपयास लावण मागत आहे. ते तुम्हास कबुल नसल्यास शेत त्यांत घ्यावे. असे न केल्यास तुमचेवर दावा करून नोटीसीचे खर्चासुद्धां पैसे घेतले जातील कळावें ता० १८।४।१९

सही

गोविंद पुरुषोत्तम पिंप्रीकर

नो० नं० १९१

## नोटीस

नोटीस बेशमी चहादु वा। महादु कोळी रा० सोनाळें ता० नळगांव जि० बुलढाणे.

यांस:—

खालीं सही करणार इसमाकडून नोटीस देण्यांत येते कीं, तुम्ही माझे लग्नाचे नवरे आहांत. मजला शहाणी होऊन सव्वा वर्ष झाले. मी एक वर्षाचे पूर्वी मी तुमचे घरीं आली असतां तुम्ही मला फार वाईट रितीनें वागविले व अखेर मारहाण करून घरांतून हाकून दिलें. इतके ही करून मी तुमचे घरीं राहिले असतें परंतु तुम्ही संसारा योग्य नाहीं असें बद्दल माझी व आपले जातीतील पंचाची पूर्ण खात्री झाली. मला आपण घरांतून हाकून दिल्या पासून आज पावेतों माझे खाण्या पिण्याचा खर्च दरमहा १ रुपये प्रमाणें एक वर्षाचे रुपये १० माझा पालन कर्ता नामें सोनू वा। भोनू यांस कर्ज झाले आहे तें देऊन रुपये पावल्याबद्दल त्याची पावती ही नोटीस पावल्यापासून एक महिन्याचे आंत घ्यावी. मी फारकती मागितली असतां दिली नाहीं. तरी नोटीस पावल्यापासून एक महिन्याचे आंत वर नमुद केलेला खर्च देऊन माझे फारकतीची तजवीज करावी. तसें न केल्यास दुसरा घरठाव करीन. मग तुमचे कोणतेच प्रकारची तक्रार ऐकली जाणार नाहीं. व वरील दर्शविलेला खर्च १ महिन्याचे आंत देऊन माझे पालन कर्त्याची पावती न घेतल्यास कोर्ट खर्चा सुद्धांपोच्य कोर्टात दावा करीन. तक्रार ऐकली जाणार नाहीं.

कळावें. ता० १६।४।१९

सही

बनो मर्द चहादु कोळी निशाणी खुद हातची बागडी

नो० नं० १९२

## नोटीस

नोटीस बेशमी शंकर वा। पांडुजी पंडीतकर सोनार हल्लीं राहणार बेंबे कादळी ता० दारव्हा जिल्हा यवतमाळ

यांस:—

खालीं सही करणार इसमाकडून नोटीस देण्यांत येते कीं, मी तुमची लग्नाची बायको असून लग्नलागल्यास अंदाजा १०—११ वर्षे झालीं. तुम्ही मला आपले घरी ६-७ वेळां नेले. तुमचे घरीं असतांना तुम्ही मला चांगल्या रितीनें वागवित नसून विनाकारण मारहाण करून त्रास देत असतां. ऋतुशांती झालेवर ९ ६ महिने तुमच्या घरीं असतांना तुम्ही मला फार बेपर्वाईनें वागविले व हरहमेषा मारहाणकरून फार त्रास दिला. एकंदरीत तुम्ही दुर्व्यसनाच्या नादीं लागून मला फार छळ केला. असे असून ही मी तुमचे घरी राहण्यास राजी असतां तुम्ही मला वाटेल तसा धमक्या देऊन मी जाण्यास राजी नसतां माझे अंगावर असलेले सर्व दागिनें काढून घेऊन बरोबर दस्तानें तुम्ही मला माझे बापाचे घरीं नेऊन घातले. त्यास अंदाजा २॥ वर्षें झाली. माझा बाप आंधळा असल्यामुळें त्याच्याकडून माझी व्यवस्था कांहींच झाली नाहीं. मी सावकारी कर्ज काढून आजला उदरनिर्वाह चालविला असून पावेतों मला व्याजासुद्धां ६०० रुपये कर्ज झाले आहे. कर्ज फार झाल्यामुळें व हल्लीं या अडचणीच्या दिवसामुळें कर्ज कोणी देत नाहींत. त्यामुळें उपासमारीची पाळी आली आहे. मी तुम्हास बरेच वेळां येऊन जाण्या विषयीं सांगून पाठविले. परंतु तुम्ही मला नेले नाहीं. करितां अखेर या नोटीशीनें तुम्हास कळविते कीं, ही नोटीस पावल्यापासून एक महिन्याचे आंत माझेवर झालेल्या कर्जाची फेडकरून मला घेऊन जावे मी येण्यास कबूल आहे. या प्रमाणें मुदतींत न केल्यास तुम्हास माझी गरज नाहीं असे समजून मुदती नंतर हीच नोटीस फारकत समजली जाऊन या फारकतीच्या आधारें मी दुसरा नवरा करीन. तुमचा माझ्यावर नवरे पणाचा किंवा दुसरे कोणते ही प्रकारचा जो जो म्हणून हक्क असेल तो तो सर्व या लेखावरून रद्द होऊन तुमची माझ्यावर सत्ता व हक्क दाखविण्यास तुम्हास कांहीं एक अधीकार राहणार नाहीं. दाखविल्यास रद्द असे. ही नोटीस राजी खुषीनें लिहून दिली ती सही असे ता० २२।४।१९

द० रंगनाथ गोविंद आंबडे रा० पुसद

सही

नि० चा आंगठा मुक्ता मर्द शंकर सोनार हल्लीं रा० बनोली इसारा ता० पुसद जि० यवतमाळ. इचे डावे हातचा असे.

नो० नं० १९३

## नोटीस.

नोटीस बेशमी रा. रा. रामचंद्र भगवान जात सोनार माळवी रा. शिवांव ता० खामगांव येथेंत मही जवळ

यांस:-

खालीं सही करणार सोनाबाई मर्द रामचंद्र सोनार रा० नीमगांव ता० मलकापूर इसमाकडून नोटीस देण्यांत येते की तुम्ही माझे लग्नाचे नवरे आहांत. तुमचे बरोबर माझे लग्न झाल्यास ८ वर्षें झाले असेकडेस ४ वर्षापासून तुम्हास महारोगाचा व्यास झाली आहे. करितां तेव्हांपासून मी आपले बापाचे घरीं राहत आहे हल्लीं माझा विचार दुसरे बरोबर घरठाव करण्याचा आहे. तुम्हांस फारकती मागावी तर तुम्ही देत नाहीं. तरीही नोटीस पावल्यापासून आठ दिवसात मजला फारकती द्यावी न दिल्यास नोटीस हीच फारकती समजून मी दुसऱ्या बरोबर घरठाव करीन. मग तुम्ही कोणतेही प्रकारें तक्रार आणल्यास ती या नोटीस आधारें रद्द असे कळावें ता० १६।४।१९१९ ई.

सही

सोनाबाई मर्द रामचंद्र सोनार नि. आंगठा हातचा

नो. नं. १९४

## नोटीस

नोटीस बेशमी अंबादास जगन्नाथ महाजन व गणपत व पांडु वा। श्रीकृष्ण अ० पा० आई राधाबाई जवजे श्रीकृष्ण महाजन तर्फें कुल मुखत्यार अज्ञानाचा चुलता अंबादास जगन्नाथ महाजन रा० कनचे अडगांव ता० आकोट

यांस:—

खालीं सही करणार यांजकडून नोटीस देण्यांत येते कीं, तुम्ही आम्हास गहाणखत रु० १००० चे ता० २१ एप्रिल सन १९१३ रोजीं करून दिले. त्या गहाणखताची रक्कम सन १३२३ फसलीचे चैत्र शु॥ १ रोजीं मुद्दल व व्याज या मुदतीं चुकते देण्याचा करार केला होता. परंतु आपण करारप्रमाणें रक्कम चुकती न केल्यामुळें मला ही नोटीस देणे भाग पडले आहे. तरी ही नोटीस पावल्यापासून ८ दिवसांचे आंत चुकती रक्कम देऊन अमचे हातची पावती घ्यावी. असे न केल्यास नोटीस पोंहोचले तारखे पासुन पुढें व्याज दरमहा दरशेंकडा रु० २ दोन प्रमाणें घेतले जाईल. व या नोटीसीचा खर्च तुमचे जवळून घेतला जाईल

कळावे ता० २२।४।१९१९

सही

शिवलालजी सालकरामजी दु० अडगांव मालक बालकीसनदासजी व फतेलालजी व नारायणदासजी तर्फें मु० मोहनलाल धनरतन द० खु०

नो० नं० १९१

## जाहीर नोटीस

रा. रा. तुकाराम हरी चांभार रा. पळशी मोठी वाल्हुरनाईक ता० खामगांव जि० बुलढाणा यांस:—

खालीं सही करणार इसमाकडून जाहीर नोटिसीनें कळविले जाते कीं मजला आई नाहीं बाप नाहीं मी आज तीन वर्षापासून मोल मजुरी करून पोट भरते आणि मोलमजुरींत पोट नभरले तर माझे मर्जीनें दुसरा घरठाव केला आहे त्या माझ्या सावतर बापानवळून खर्चास घेते असे आज पावेतो मी त्यांचपासून एकंदर रुपये १६० दिढीने कर्ज काढले आहे. तुम्ही मजला टाकून दिल्यास आज तीन वर्षें झाली. मी तुम्हास संसार करण्यासाठीं मजला घेऊन जावे असाबद्दल तीनवार नोटिसा दिल्या येवढी पंच जळगांवास केशव सोनाजी, वगैरे मंडळी जमा केली आणि त्यावेळेस तुम्ही रुपये १६० देऊन घेऊन जा मी येण्यास तयार आहे. तर त्यावेळी तुम्ही सांगितले कीं मी वागवित नाहीं हिनें दुसरा घरठाव करावा. मी खावटी देत नाहीं. मी आज रोजीं तोंडी फारकत दिली आहे असे पंचां-मध्ये साफ सांगितले या तोंडी फारकतीचे आधारें मी दुसरा घरठाव करणार होते परंतु आपल्यास पुन्हा जाहीर नोटीस देऊन कळविते कीं त्याप्रमाणें तुम्ही

तुमच्या लग्नाच्या वापकोत वागविता या-प्रमाणें मजकडी वागवावें मी तुमचा संसार करण्यास तयार आहे. जरी तुम्ही तोंडी फारकती दिली तरी माझी इच्छा तुमचा संसार करण्याची आहे तर तुम्ही ही नोटीस पावल्यापासून आठ दिवसांत माझ्या-घरतर वापाचे रुपये १५० देऊन घेऊन जावें. या प्रमाणें न केल्यास तोंडी फारकतीचें आधारें तुम्ची नकार न ठेवतां दुसरा घरठाव करीन. कारण तोंडी फारकतीचे आधारें शिवाय नवरेपणाचा हक्क नाहीं. मग तुम्ही जीवन नवरा असतांना घाट करिला या आरोपाचां जबाबदारी माझ्यावर राहणार नाही. आणि तुमचेकडे माझ्या सावतर वापाचे रुपये १५० तुमचेकडे घेणें आहे त्याबद्दल दिवाणी कोर्टांत दावा करून पैसे वसूल केले जातील. ही नोटीस दिली सही तारीख १.१४।१९१९ इ० मुक्काम आकोला.

सही.

धुरपती भर्द तुकाराम चांभारीण नि.
खुद वांगडी रा० ढोरपगाव
ता० खामगांव पो० पिंपळ
गांवराजा.

न० न० १९९

## विक्रीस तयार

आमचे छापखान्यांत इस्तखाताचे, वकील पत्राचे, पास भरण्याचे, सिरटफार्ट पत्राचे व नकलेकरितां करावयाच्या अर्जाचे नमुने छापून तयार आहेत ते आमचे छापखान्यात कोणत्याही वेळीं विक्रीस तयार आहेत.

वऱ्हाडसमाचार कार्यालय, सदाशिवाश्रम, आकोलें } मॅनेजर.

## पत्रव्यवहार.

[illegible]

[illegible] आईल एंजीन.

वऱ्हाड प्रांतात अगदीं पहिल्याने आईल एंजीन कोणी आणलें, तें कोणत्या कामाकरितां आणिलें, तें किती दिवस चाललें, त्यामुळें मालकास नफा नुकसान काय झालें, तें चालविण्यास चाकरगार मनुष्य ठेविला होता किंवा काहीं त्याला रोज तेल किती लागत असे, त्यांतून दररोज किती काम होत असे, त्याला मोड तोड किती होत असे, व आठवड्यांत किती चाले व किती बंद पडे इत्यादी बाबतींत माहिती मिळणें कठिण आहे. कदाचित् आज पर्यंत या इंजनानें काम करून त्या योगानें विकत घेणाराचे पैसे व्याज परत मिळवून दिले असतील. कदाचित् हें इंजन न चालल्यामुळें एका मागून एक मालक बदलून वर्ष दोन वर्षांतच कचऱ्यात नाऊन पडलें असेल. कदाचित् एक दोन वर्षें सुरळीत चालल्यामुळें मालकाला फायदा झाल्यामुळें मोठें इंजन घेऊन हें कमी किंमतींत काढून टाकलें असेल, व कदाचित हें आणल्यापासून देखील मुळींच चाललें नसेल. हें पहिलें इंजन किंवा त्याच्या बरोबर किंवा कांहीं दिवसानीं मागाहून आलेली इंजनें यांचा प्रत्यक्ष परिस्थितीशीं जरी आपणांस आज कांहीं कर्तव्य नाहीं तरी यांच्या पासून इतकी गोष्ट निश्चित होते कीं ही इंजनें चालल्यामुळें यांच्या मागून पुष्कळ इंजनें वऱ्हाडात आलीं. ही इंजनें जर चांगली चाललीं नसतीं तर आज कांहीं खेड्यांतून देखील दिसणारी इंजनें शहरांत देखील पहावयास सपडलीं नसतीं. व आज जे आईल इंजनावर कारखाने चालू आहेत त्यांचा प्रारंभ देखील नसता.

पहिल्या प्रथम आणलेल्या इंजनामुळे फायदा झालेला आहे असी मी जरी खात्री देऊं शकत नाहीं तरी वर सांगितल्याप्रमाणें मुद्दाम धरण्यास कांहीं हरकत नाहीं.

ही पहिल्या प्रथमच्या बडबडीची एक दोन वर्षें गेल्या नंतर पुष्कळ लोकांना आईल इंजीन घेऊन कांहीं उद्योग करावा असें वाटूं लागून त्यांनीं उद्योगास आरंभ केला. व या मुळें गेल्या सात आठ वर्षांत आईल इंजनावर चालणारे पुष्कळ कारखाने अस्तित्वांत आले. आजच्या लेखात या कारखान्याबद्दलचाच विचार करावयाचा आहे.

हे कारखाने मजुरीचीं कामें करणारे कारखाने आहेत. यांतील मुख्य कामें म्हणजे दळण दळून देणें व कापसांतील सरकी काढणें हीच होत. या शिवाय तेलाच्या घाण्या घेऊन कांहीं ठिकाणीं तेल काढण्याचे कारखाने थोडे थोडे निघाले आहेत. पाणी फार खोल असल्यामुळें पंप चालविण्याकरितां इंजनें घेतलेलीं नाहीत असें म्हणण्यास हरकत नाहीं. परंतु पुण्याच्या बाजूस पंप चालविण्याकरिता घेतलेल्या इंजनांना देखील कारखाना या सदराखालीं घेण्यास हरकत नाहीं [illegible]

[illegible]

कणारांनीं करून दिलेल्या नमुन्या बरहुकूम यातील यंत्र योजना झालेली आहे.

(२) कांहीं कारखान्यांतील यंत्र योजना आईल एंजीन डूपल्डर किंवा कोणी तरी एंजीनीअर (फर्स्ट क्लास किंवा सेकंड क्लास) यांनी केलेली आहे.

(३) अलीकडे शेतकी खात्याच्या मार्फत सुमारें १५।२० कारखाने लोकांनीं काढले आहेत.

(४) व क्वचित् ठिकाणीं कारखाना काढणारांनीं इतर सर्व मार्ग सोडून कोणी तरी "आईल एंजीन स्पेशालिस्टास" आपल्या तर्फे काम करण्यास पगार किंवा कमिशन किंवा दोन्ही देऊन कारखाने काढलेले आहेत.

### आज या कारखान्यांची स्थिती कशी आहे.

वर सांगितलेल्या चार प्रकारांनीं कोणत्याही प्रकारानें अस्तित्वांत आलेले कारखाने आज कोणत्या स्थितींत आहेत, त्यांत काम बरोबर होत आहे किंवा नाहीं. रोज शकेल प्रमाणशीर मळत आहे किंवा नाहीं. माहितोंदीचें प्रमाण काय आहे इत्यादि बाबतींत सर्व कारखान्यांची माहिती मिळणें शक्य नाहीं. परंतु निरनिराळ्या ठिकाणीं जे जे कारखाने पाहिले आहेत व पुष्कळ कारखान्यांबद्दल मला जी माहिती मिळालेली आहे त्यावरून माझी अशी खात्री झालेली आहे कीः—

[१] जे कारखाने आज चांगल्या स्थितींत दिसत आहेत ते कांहीं अंशीं नशिबाच्या वाईट रीतीला भेलेले आहेत.

[२] जे कारखाने आज विकावयास काढलेले आहेत त्यांचीं यंत्रें बिघडल्यामुळें मालकास ते कोणत्या तरी गळ्यात हा कून आपण सुटून जावयाचें आहे.

[३] जे कारखाने मालकांनीं चालू ठेवले आहेत परंतु गिऱ्हाईक आल्यास विकण्यास तयार आहेत त्यांत यंत्रें बिघडल्यामुळें किंवा बरोबर न लावल्यामुळें तेलाचा खर्च फार आहे.

[४] जे कारखाने अद्याप चालू झालेले नाहींत ते देखील मालकांना डोईजड झालेले आहेत.

या शिवाय कांहीं ठिकाणीं कारखाने चांगले चालू आहेत.

### कारखाने नुकसानींत येण्याची कारणें

वर दिलेल्या चार कारणांपैकीं कोण त्याही कारणानें कारखान्यांत नुकसान येऊं लागलें तर त्याचीं कारणें शोधून पाहिल्यास पहिलें व मुख्य कारण असें दिसून येतें कीं कारखानदारांना यंत्राबद्दलची मुळींच माहिती नसतें इतकेंच नाहीं तर त्यांचीं इंजनाबद्दलचीं मतें देखील फारच विचित्र असतात.

एका गांवांतील लोकांच्या मतानें क्रूसलेस्टोनचें इंजन सर्वांत उत्तम आहे. कारण [illegible]

[illegible] दोन्ही वाईट ठरलें आहे [illegible] गांवांत क्रूसलेस्टोनच्या इंजनावर घातलेलीं जिनिंग फॅक्टरी चांगली चालली नाहीं. परंतु याहून आश्चर्याची गोष्ट झटली म्हणजे या दोन गावांशिवाय तिसऱ्या गांवांतील लोकमताप्रमाणें क्रूसलेस्टोनचें इंजन दळण्याच्या कारखान्यास चांगलें चालतें परंतु जिनास चालतें नाहीं व याला उदाहरण म्हणून ते पहिले व दुसरे गांवांतील लोकांचा अनुभव सांगतात. या ठिकाणीं क्रूसलेस्टोनचें इंजन फक्त उदाहरणाकरितां घेतलें आहे. परंतु प्रत्येक इंजनाबद्दल प्रत्येक गांवांतील लोकांचा निरनिराळा ग्रह झालेला आहे. वास्तविक पाहता क्रूसलेस्टोन, रस्टन, टॅंगी, फिल्डींग, हार्नेस्बी, गार्डनर क्रासली इ. इ. प्रसिद्ध इंजनापैकीं कोणतेंही इंजन दळणें काढणें, भरडणें, सरकी फोडणें, पाणी उपसणें, ऊस गाळणें, तेल काढणें, मागचालविणें, धीन दखल करणें, छापखाना चालविणें, कापसातील सरकी काढणें इत्यादी कामांपैकीं कोणत्याही कामास चांगलें चालेल इतकेंच नाहीं तर याशिवाय आणखीं कोणतेंही इंजन असलें तरी ते चालण्यास कांहींच हरकत पडूं नये. परंतु आमच्या वऱ्हाडातील प्रत्येक गांवांतील लोकांचें प्रत्येक इंजनाबद्दल लोकमत विचित्र झालेलें आहे. व कोणी किती ही सांगितलें तरी हें मत बदलेल किंवा नाहीं या बद्दल मोठी शंका आहे.

वर दिलेल्या कारणांमुळें कांहीं लोकांनीं एकाजातीचीं इंजनें घेतलीं तर कांहींनीं दुसऱ्या जातीचीं इंजनें घेतलीं कांहींनीं आणखी एकानिराळ्याच जातीची घेतलीं. असें झाल्यामुळें आज वऱ्हाडप्रांतांत जीं इंजनें आहेत त्या सर्वांमध्यें पुष्कळच फरक दृष्टीस पडतो [illegible] आईल [illegible] चुकीची कल्पना [illegible] एंजीन चालविणें [illegible] लागत नाहीं. व [illegible] तर सरकारनें न [illegible] असें वरील विधा[illegible] ध्यांत येते. स्टीम [illegible] नोकर ठेवण्याचा [illegible] कायदा केला आ[illegible] म्हणूनच स्टीमएंजीन [illegible] ठेवावयाचा. परंतु [illegible] आईल एंजिनचें का[illegible] ठेवला पाहिजे अ[illegible] न्हावी धोबी, तेली, [illegible] गार, लोहार, सुतार, [illegible] तांबटकर, शेतकरी, [illegible] कोणासही आईल एं[illegible] यास होणार नाहीं [illegible] नाहीं, किंवा यांस विकण्[illegible] जर आईल एंजीन चालविण्यास कोणाही मनुष्य चालतो तर असा दुसऱ्या पुष्कळ गोष्टी आहेत कीं ज्या बद्दल सरकारी कायदे झालेले नाहींत. हजामत न्हाव्यानेंच केली पाहिजे असा सरकारी कायदा नसून सरकारनें फक्त न्हावी लोकांना (लायसेन्स) परवाने दिलेले नाहींत. तेव्हां न्हाव्याकडूनच हजामत करून घेण्याची काय जरूर आहे, पुष्कळ सुतारास, तांब[illegible] [illegible], लोहारास, इ० इ० कोणास [illegible]

लग्नसंबंधी चा [illegible]

चांभार, यांस का [illegible] कोडा नीटकरण्यास चांभारास कां देतात! कपडे धुवावयास धोब्यासच कां देतात! भंग्यास का देत नाहींत!

याप्रमाणें एक ना दोन हजार गोष्टी दाखविता येतील चांगल्या न्हाव्या खेरीज दुसऱ्या कोणाकडून जर हजामत करविली तर होण्याचें कातडें घासून किंवा कापून निघण्याचा जितका संभव आहे तितका संभव चांगल्या एंजीन ड्रायव्हरा शिवाय आईल एंजिनचालविलें असता, इंजनाचें सिलेंडर किंवा बेअरिंग घासून किंवा कापून निघण्याचा संभव आहे.

ज्या लोकांना हजामत करण्यास सुतारापुढे बसण्यास सांगितलें तर, लोक आपली टवाळी करीत आहेत असें म्हणतील, व त्याच प्रमाणें सुतारकाम, लोहारकाम, शिवण्याचें काम, चांभाराचें काम, धोब्याचें काम, न्हाव्याचें काम, इत्यादि कामें करण्यास शिक्षण व कसब लागतात. हे समजणें त्या लोकांना आईल एंजीन चालविण्यास कोणी ही मजूर देखील चालतो हे सर्व बाटणें हें जगांतील एक नवीनच आश्चर्य नव्हे काय?

अपूर्ण

वऱ्हाडसमाचार

मिति अधिक वैशाख शुद्ध १२ शके १८३७

## सहकारित्वाची चळवळ.

गेल्या दहा पंधरा वर्षांत देशाच्या अत्यंत हिताच्या व दीर्घकाळपर्यंत टिकणाऱ्या अशा ज्या कित्येक चळवळी आमच्या देशांत झाल्या त्यांत सहकारित्वाच्या चळवळीस अग्रस्थान द्यावें लागेल. या चळवळीच्या यशस्वीपणाबद्दल अद्यापि सरकारी अधिकारी व लोकसमाज यांच्यांत मतभेद राहिला नाहीं. ही संस्था अपले हातपाय सांवरून फैलावत आहे याची साक्षी सरकारी रिपोर्ट देत आहेत. लॉर्ड कर्झन हे हिंदुस्थानचे व्हाइसराय असतां त्यांनीं हिंदुस्थानच्या हिताच्या अशा ज्या दोन गोष्टी केल्या त्यातली ही एक आहे हें हीं सर्वांस माहित आहे. वस्तुतः या चळवळीचे पितृत्व सर विल्यम वेडरबर्न यांचेकडे आहे. कारण इकडे अधिकारारूढ असता शेतकऱ्यांचा तरणोपाय म्हणून सहकारित्वाच्या पतपेढ्या स्थापाव्या हीं सूचना त्यांनीं प्रथम केली होती. पण ते काल अशा कल्पनांना मूर्त स्वरूप देण्यास अनुकूल नव्हता म्हणून म्हणा, किंवा अन्य कारणामुळें म्हणा, पण स्टेट सेक्रेटरी साहेबासारख्या उच्च अधिकाऱ्यांना सर साहेबांचें म्हणणें पटलें नाहीं व ही चळवळ त्यावेळीं अस्तित्वात आली नाहीं, आणि लॉर्ड कर्झन साहेबांच्या कारकीर्दीपर्यंत या चळवळीचें बीज खडकावर पेरलेल्या बीजाप्रमाणें निष्फळ झालें, पण लॉर्ड कर्झन यांचे वेळीं [illegible] पाणी घालून अंकुरोद्भव करण्यांत आला. सरकारनें ही चळवळ हातीं घेऊन तिच्यासाठीं एक स्वतंत्र कायदा पास करून घेतला आणि प्रांतोप्रांतीं या चळवळीला मूर्त स्वरूप देण्यासाठीं स्वतंत्र अधिकाऱ्यांच्या नेमणुका करण्यात आल्या. अशा रीतीनें या चळवळीचें खरें पितृत्व जरी सर विल्यम वेडरबर्न यांच्याकडे असलें तरी व्यावहारिक दृष्टीनें लॉर्ड कर्झन यांच्याकडे तें आलें. ही चळवळ उत्पन्न होऊन आता बारावर वर्षें झालीं. या अवधीत सरकारी अधिकाऱ्यांच्या हाताखालीं व शिक्षणाखालीं देशी गृहस्थ बरेच तयार झाले आणि आतां ही चळवळ पूर्णपणें लोकांच्या हातीं द्यावयास पाहिजे असें बऱ्याच हिंदुस्थानच्या हितचिंतकांस वाटूं लागलें आहे. [illegible] येथें नुकत्या भरलेल्या सहकारित्वाच्या [illegible] मि. काड्यू यांनीं या संबंधांत [illegible] भाषण फार विचार करण्यासारखें होतें. त्यांच्या भाषणाचा मथितार्थ असा होता कीं अशा चळवळी लोकांच्या व्यवहारिक हितासाठीं चालविलेल्या असल्या तरी त्या सुरळीतपणें चालविण्यास नैतिकसामर्थ्य अत्यंत अवश्य असतें. हें नैतिक सामर्थ्य म्हणजे धैर्य, स्वातंत्र्यप्रीति, स्वावलंबन व आत्मसंयमन इ० गुणांच्या समुच्चयानें येत असतें. जसें शारीरिक बळ व्यायामानें वाढतें, तसें नैतिक बळ ही या गुणांच्या व्यासंगानें वाढत असतें. तेव्हां तसा नैतिक व्यायाम लोकांच्या हातून घडला पाहिजे व त्यासाठीं ही चळवळ सरकारनें सर्वस्वी लोकांच्या स्वाधीन करावयास पाहिजे. सहकारित्वाची चळवळ म्हणजे सरकारचें एक खातें नाहीं. ती लोकांची चळवळ आहे व लोकांवर ती चालविण्याची जबाबदारी आहे हें लोकनायकांना भासविण्यासाठीं सरकारी अधिकाऱ्यांनीं तींतून आपलें अंग काढून ती पूर्णपणें लोकांकडेस सोंपविली पाहिजे. श्रीमंतांच्या लाडक्या मुलांप्रमाणें तिला स्वतंत्रता न देणें हें कधीं श्रेयस्कर होणार नाहीं. त्याला धावूं नकोस, उडी मारूं नकोस, असें करूं नकोस, तसें करूं नकोस असें म्हणून निष्क्रिय ठेवण्याचा परिणाम शेवटीं मंदपणा हा होत असतो. तसेंच या सहकारित्वाच्या बाबतींत होऊं देणें व सरकारी अधिकाऱ्यांनीं अद्यापि या चळवळीचीं सूत्रें आपल्या हातीं ठेवणें म्हणजे सहकारित्व या शब्दाच्या खऱ्या अर्थाचा लोप करणें आहे. मि. काड्यू यांचें हें साग्र भाषण सरकारनें अवश्य विचार करण्यासारखें आहे.

## मद्रासी विरुद्ध महाराष्ट्रीय.

गेल्या ईस्टरच्या सुटींत अड्यार येथील थिऑसॉफिस्ट मंडळींत जातिभेदाचें बंधन न पाळतां जें प्रीतिभोजन झालें त्या संबंधानें टीका करतांना मुंबईच्या एका दैनिक मराठी पत्रानें एकंदर मद्रासी लोकांना मेंढरें असें निंद्यपणाचें विशेषण लाविलें आहे! आमच्या या व्यवसायबंधूची टीका न्यायाच्या, शिष्टाचाराच्या, तर्काच्या व राष्ट्रहिताच्या अशा सर्वच दृष्टीनें सर्वथा गर्हणीय असल्यामुळें आम्ही त्या टीकेचा जोरानें निषेध करतों. मद्रासकरांना मेंढरें म्हणतांना 'संदेश'कर्त्यांनीं असें स्पष्टपणें म्हटलें आहे कीं ही मंडळी मिसेस ॲनी बिझांट बाईचे इतके अंधभक्त बनली आहे कीं त्या म्हणतील त्या गोष्टीला मद्रासी लोक माना डोलावतील. त्यांना स्वतःची अशी बुद्धि नाहींच. मिसेस बिझांटबाईच्या प्रेरणेनें हें प्रीतिभोजन घडून आलें ही गोष्ट अगोदर खोटी आहे. कारण, त्या बाई त्यावेळीं मद्रासला नव्हत्या. संयुक्त प्रांतांत गोरखपूर येथें प्रांतिक परिषदेचें अध्यक्षस्थान स्वीकारण्यासाठीं तिकडे गेल्या होत्या. तेव्हां त्यांच्या वैयक्तिक वजनाचा हा परिणाम असणें अशक्य आहे. दुसरी गोष्ट काहीं थोड्याशा थिऑसॉफिस्ट मद्रास्यांनीं जरी आपला विवेक मिसेस बिझांट बाईच्या स्वाधीन केला होता अशी कल्पना केली, तरी तेवढ्यावरून एकंदर सर्व मद्रासीबंधुवंशानें वरच्यासारखें आक्षेपास पात्र असें विधान करणें हें जितकें तर्कशास्त्रास तितकेंच शिष्टाचाराला ही सोडून आहे आणि ही गोष्ट वेदाध्ययनानें मतिमंद झालेल्या संदेशकारास कळली नाहीं तरी प्रत्येक विचारी महाराष्ट्रीयास ती मान्य झाल्याशिवाय राहणार नाहीं. अशी सरसकट विधानें करणें फार धोक्याचें व अहितावह असतें. अशलीं विधानें महाराष्ट्रीयांविषयीं इतर प्रांतीयांनीं केलेलीं आम्हीं पाहिलीं नाहींत, आणि जर त्यांनीं तीं उद्यां केलीं तर त्यांचा ही आम्ही तितक्याच जोरानें निषेध करूं. एकंदर बंगाली लोक नेभळे, मद्रासी लोक शेळपट मेंढरें किंवा गुजराथी लोक धनलोभी हें म्हणणें जितकें मूर्खपणाचें आहे तितकेंच एकंदर महाराष्ट्रीय लोक गर्विष्ठ, उद्दाम आणि विवेकशून्य आहेत असें म्हणणेंही तितकेंच अविचाराचें आणि अन्यायाचें होईल. अशलीं विधानें करण्यापासून राष्ट्रीय हित कोणतें साधणार याचाही विचार ज्याला केसरीकर्त्यांनीं 'राष्ट्रीय' असें सर्टिफिकेट दिलें आहे त्यानें करूं नये हें आश्चर्य आहे. मद्रासी, बंगाली, गुजराथी, महाराष्ट्रीय वगैरे हिंदी राष्ट्राचे निरनिराळे अवयव जर अशी परस्परांची छिद्रें पाहून त्यांवर आघात करूं लागले तर राष्ट्राचें ऐक्य, प्रेमभाव, आणि सहकारित्व उत्पन्न करणें हें जें आमचें सर्वांचें ध्येय तें कसें साध्य होईल? बरें, गतानुगतिकत्वाचे बाबतींत दुसऱ्याला नावें ठेवण्याचा अधिकार आम्हां महाराष्ट्रीयांना तरी खरोखर कितीसा आहे! खुद्द संदेशकर्ते हे केसरीच्या पुढ्यांतले अतएव स्वतःस 'राष्ट्रीय' पक्षाचे म्हणविणारे असतां त्यांनीं स्वतःवर प्रसंग येऊन बेतला असतां आपण 'मवाळ' आहों असें कबूल करण्यांत तरी टिळकांचेंच अंध अनुकरण केलें नाहीं काय? तेव्हां तरी संदेशकर्त्यांनीं आपलें सिंहत्व टाकून मेंढरेपण का स्वीकारलें? फायद्याचें दिसलें म्हणूनच काय? असें जर कोणी त्यांना विचारलें तर ते यावर काय उत्तर देतील? सारांश काय, तर मद्रासी बंधूंवर मेंढरेपणाचा आरोप करून त्यांच्या संबंधानें संदेशकर्त्यांनीं काढलेले उद्गार अत्यंत अप्रयोजकपणाचे व बालिश होते. तसे उद्गार पुनः काढण्याची आमच्या कोणाही व्यवसायबंधूस बुद्धि न होवो असें आम्ही इच्छितों.

## साप्ताहिक युद्ध वृत्त.

युद्ध सुरू झाल्यापासून त्यासंबंधाच्या प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या संशयानें नानाविध कल्पना पिकूं लागल्या म्हणून आणि लोकांना विश्वसनीय आणि सुसंगतवार युद्धाची माहिती नियमितपणें व्हावी म्हणून सरकारनें दर आठवड्यास साप्ताहिक युद्धवृत्त प्रसिद्ध करण्याचें हातीं घेतलें. हीं साप्ताहिक वृत्तें इंग्रजींत व मराठींत निघत असतात. वऱ्हाड व मध्यप्रांतच्या स्थानिक सरकाराकडून युद्धाचें साप्ताहिकवृत्त [ इंग्रजी व मराठी ] आमचेकडे प्रसिद्धी साठीं व माहिती साठीं येत असतें. याबद्दल आम्ही आमच्या स्थानिक सरकारचे अत्यंत आभारी आहोंत. या वृत्तपत्रांतील माहिती सरकारकडूनच निघत असल्यामुळें तिच्या विश्वसनीयतेबद्दल शंका घेण्यास जागाच नाहीं. शिवाय इंग्रजी भाषाही चांगली मुद्देसूद असते आणि माहिती ही मोठ्या पद्धतशीर रीतीनें आणि सुसंगतवार दिलेली असते. तसेंच यांचे मराठींत होणारें भाषांतर ही सुरस असून तितक्याच पद्धतशीर रीतीनें तयार केलेलें असतें. एकंदरीनें हीं वृत्तपत्रें जशीं असावयास पाहिजेत तशींच असतात परंतु तीं छापून प्रसिद्ध होऊन आमच्या हातांत येईं तों पर्यंत तीं साताठ दिवसांचीं होऊन जातात. त्यांच्या प्रसिद्धीच्या तारखेपासून तीं आमच्या हातीं पडेपर्यंत दीड दोन आठवडे सहज लोटतात. त्यामुळें त्यांचा आम्हांस व्हावा तितका उपयोग होत नाहीं हें मोठ्या दिलगिरीनें आम्हांस नमूद करणें लागतें. तेव्हां त्या वृत्त पत्रांचा योग्य उपयोग व्हावा अशी सरकारची इच्छा असल्यास त्यांचा मसुदा तयार झाल्याबरोबर त्याची नक्कल आम्हांकडे पाठविण्याबद्दल हुकूम व्हावा एवढीच आमची स्थानिक सरकारास विनंति आहे.

## तुर्कस्थानचे ग्रह.

तुर्कस्थानच्या अनिष्ट ग्रहांनीं त्या देशाला पूर्णपणें ग्रासून टाकलेलें दिसतें. तेथें ज्या तरुण पक्षाचें सध्या प्राबल्य आहे त्याच्या मूर्खपणामुळें जर्मनीचें तेथील राजकारणावर वजन पडून तुर्कस्थानला संयुक्त राष्ट्रांचे विरुद्ध शस्त्र उचलण्याची बुद्धि झाली. ही विनाशकाळची विपरीत बुद्धि होय असें आतांपर्यंत घडलेल्या प्रकारांनीं स्पष्ट दिसत आहे. आज तुर्कस्थानची जी स्थिति झाली आहे ती कोणत्याही प्रकारें स्पृहणीय नाहीं. ईजिप्तसारखा देश त्याच्या हातांतून कायमचा गेला. सामाजिक दुर्दशा पूर्णपणें ओढवली! हिंदुस्थानांतल्या मुसलमानांचीं मनें त्याच्यासंबंधानें विटलीं, मनुष्यप्राणांची हानि झाली व आता खुद्द त्या देशची राजधानी कांस्तांतिनोपल याची आक्रमण झालेल्या देशासारखी स्थिति झाली आहे. बरें ज्या जर्मन लोकांच्या मोह पाशांत भरून इंग्रजासारख्या दोस्त राष्ट्राच्या मैत्रीस तुर्कस्थान मुकण्यास तयार झालें त्या जर्मनीनें तरी त्याला धीर द्यावयाचा होता! पण तेंही घडलें नाहीं. अशा स्थितींत नुसती नामधारी सुलतान म्हणवून घेऊन कंटकमय राज्यासनावर आरूढ होऊन राहण्यापेक्षां त्या आसनाचा त्याग करणें अधिक श्रेयस्कर आहे असें कोणाही विचारी माणसास वाटणें स्वाभाविक आहे व तसें तुर्कस्थानचे हल्लीचे सुलतान पांचवे महंमद यांस वाटत आहे व ते आखेरीनें राज्यपदाचा त्याग करण्याचे विचारांत आहेत अशी बातमी आली आहे. या बाबतींत कितीसें तथ्य आहे तें आम्हांला सांगतां येत नाहीं पण जर कांहीं असलें तर त्यावरून सुलतानच्या राजसत्तेंत कशा प्रकारच्या लोकांचें वर्चस्व आहे व ते राजाच्या इच्छेविरुद्ध जाण्याइतके अधिकार मत्त कसे झाले आहेत तें मात्र चांगलें कळतें. ज्या वेळेस तुर्कस्थाननें इंग्लंडविरुद्ध लढाई जाहिर केली त्यावेळीं सुलतान साहेबांनीं आपला सध्याचा उद्देश जाहिर केला असता तर त्यांत त्यांचा अधिक शहाणपणा दिसला असता. आतां 'बुढ़े गई सो होंसे नहीं आती' असें उत्तर सुलतान साहेबांच्या तोंडावर टाकण्यास मात्र त्यांनीं जगाला संधी दिली आहे असें म्हणावें लागते.

## इटली व आस्ट्रिया

इटली प्रस्तुत युद्धांत पडतो कीं काय या गोष्टीकडे आज कित्येक दिवसांपासून

युरोपचे डोळे लागले आहेत. तटस्थ राष्ट्रांकीं एकटे तुर्कस्थानच काय तें या युद्धांत सामिल झालें. तुर्कस्थान जर्मनीला मिळाले तथा इटली ही मिळेल अशी जर्मनीला मोठी आशा वाटत होती व त्या करितां परवापर्यंत त्याची खटपटही चालली होती. इटलीचा आस्ट्रियानें बळकावलेला एक प्रांतही आम्ही तुम्हांस मिळवून देतों असें आमिष जर्मनीनें त्याला दाखविलें होतें. पण इटलीनें त्या लोभाला भुलून तुर्कस्थानसारखी आत्मघातक प्रवृत्ति दाखविली नाहीं हे इटालियन मुत्सद्यास भूषणावह आहे. साम व दाम या उपायांनीं इटली वळत नाहीं असें पाहून जर्मनीचा सार्थीदार आस्ट्रिया यानें दंडाच्या उपायाचा ही प्रयोग करून पाहिला. इटलीशीं मदम कुरापत काढण्याच्या उद्देशानें कांहीं आस्ट्रियन लोक इटलीच्या हद्दींत शिरले या प्रयत्नाचे वेळीं इटली प्रथम स्वस्थ बसला, पण पुन तशा प्रकारचा दुसरा प्रयत्न झाला, तेव्हां मात्र इटालियन शिपाई व आस्ट्रियन शिपाई यांची चकमक उडून दोन्ही पक्षांचे मिळून शंभर शिपाई ठार झाले. तरी इटलीची तटस्थवृत्ति यामुळें भंग पावली आहे असें अद्याप म्हणवत नाहीं. कारण तसें असतें तर इटलीनें आपल्या वकिलामार्फत आस्ट्रियाला या आगळिकीबद्दल तत्काळ जाब विचारला असता. पण तसे न करतां सदर बाबतींत चौकशी करून रिपोर्ट करण्यासाठीं इटलीच्या सरकारानें एका अधिकाऱ्यास नेमविलें असल्याची खबर आली आहे. या एकदर सर्व प्रकारावरून इटलीचे मुत्सद्दी अतिशय थंड डोक्याचे आहेत व कांहीही होवो, आपली तटस्थ वृत्ति सोडावयाची नाहीं असा इटलीचा कृतनिश्चय आहे असें दिसतें.

---

## बक्षीस समारंभ.

### [ गांवांतील मुलींच्या शाळेचा ]

परवांच शनिवारी [ ता० २४-४ १९१५ ] रोजीं सकाळीं ८ वाजता [ आकोला येथील ] गावांतील मुलींच्या शाळेचा बक्षीस समारंभ झाला. प्रथम गांवातल्या स्त्रियांना बोलावून मोठ्या प्रमाणात टाऊनहाल मध्यें दोन्ही शाळा मिळून एक समारंभ जुलै महिन्यांत करावा असा श्री. द्वारकाबाई वैद्य हेडमिस्ट्रेस यांचा विचार होता. परंतु मे महिन्याच्या सुट्टीपूर्वीच समारंभ करून घेण्याबद्दल शाळाधिकाऱ्यांचा हुकूम आल्याकारणानें व गावांतील शाळेची जागा लहान असल्याकारणानें दोन शाळेचे दोन वेगवेगळे समारंभ करावे असें ठरविलें व फक्त कमेटीच्या स्त्री सभासदांना बोलावून हा समारंभ उरकणें भाग पडलें. आरंभीं कांहीं मुलींनीं ईशस्तवनपर पद म्हटलें. त्यानंतर शाळेतील मास्तरांनीं " फिल्ड मार्शल अर्ल राबर्टस यांनीं साम्राज्यांतील मुलांना पाठविलेला संदेश " वाचून दाखविला. व श्री. सौ. जानकीबाई महाजनी यांनीं शाळेंत नियमानें येऊन आपापला अभ्यास नीट करण्याविषयीं व घरीं वडील माणसांनीं सांगितलेलीं लहान सहान गृहकृत्यें आपला अभ्यास सांभाळून करण्याविषयीं मुलींना उपदेश केला. त्याचप्रमाणें मास्तरांनीं व श्री. द्वारकाबाईनींही मुलींना चांगली वर्तणूक ठेवण्याबद्दल उपदेश करून " शाळेंतील अभ्यासाच्या सबबीवर वडील मंडळींनीं सांगितलेलीं कामें चुकविण्याचा मुलींचा प्रघात असतो परंतु मुलींनीं अशी चुकवाचुकवीची वागणूक पत्करली तर घरांतील कामें मुळींच येणार नाहींत व त्यामूळे पुढें तुमचेंच नुकसान होईल. व्यवस्थितपणें वागल्यास अभ्यास व लहान मुलींना अवश्य तीं घरकामें हीं दोन्ही तयार करतां येण्यासारखीं आहेत असें सांगितलें. मग बक्षिस मिळणार या विचारानें आनंदित व उत्सुक झालेल्या बालिकागणाला जिच्या तिच्या योग्यतेप्रमाणें पुस्तकें व चित्रें वाटण्यांत आलीं. पुन्हां मुलींनीं एक स्वागतपर पद म्हटलें व श्री० द्वारकाबाईनीं समारंभाला आलेल्या स्त्रियांचे आभार मानून दर महिन्याला येऊन मुलींना उत्तेजन देत जाण्याविषयीं त्यांस विनति केली. नंतर राष्ट्रगीत व पान सुपारी होऊन समारंभ पार पडला.

---

## वऱ्हाडवृत्त.

हवामानः— गेल्या आठवड्यांत हवा म्हणण्या सारखी वाईट नव्हती. शनिवार पासून तर रात्रीची हवा केवळ अपूर्व वाटते स्वच्छ चांदणें आणि वसंतातील वाऱ्याची समशीतोष्ण झुळुक हीं श्रांत व दुःखी मनाला आल्हाद दिल्यावांचून रहात नाहींत. पहाटे थोडी गुलाबी थंडीही चमकते आणि दुपारीं ऊन कडक पडतें. एकंदरीनें हवा निरोगी म्हणण्यास मुळींच प्रत्यवाय नाहीं. अशीच हवा राहिल्यास प्लेगची स्वारी आमचे शहरीं टिकूं पहात आहे ती पळ काढील असें वाटतें कारण अलीकडे त्याची विशेष गडबड दिसून येत नाहीं.

रा० रा० गणपतराव माधव वडोडकर, सबॉर्डिनेट जज्ज, यांस रजेवरून परत आल्यावर यवतमाळ येथें नेमलें आहे. आणि त्यांनीं आपल्या कामाचा चार्ज घेतल्यावर रा० रा० बळवंत रघुनाथ पेंढारकर यांस मंडला येथें बदलण्यांत आलें.

रा० रा० के० एम० नठार, डेप्युटी कमिशनर, बुलढाणा, यांस ता० १ मे १९१५ पासून किंवा ते घेतील त्या तारखेपासून सहा आठवड्यांची हक्काची रजा मिळाली असून त्यांचे जागीं ते परत येईपर्यंत रा० रा० आर० हामिल्टन, आय० सी० एस० असिस्टंट कमिशनर खामगांव, यांस आफिशिएटिंग डेप्युटी कमिशनर नेमण्यांत आलें आहे.

रा० रा० धनजीशा दोराबजी दादीमास्तर, एक्स्ट्रा असिस्टंट कमिशनर, बुलडाणा, यांस खामगांव सबडिव्हिजनवर नेमलें.

रा० रा. महादेव शंकर देशमुख, तहसिलदार, चांदूर, यांस टेंपररी एक्स्ट्रा असिस्टंट कमिशनर एड्‌थ मेड करून बुलढाणा येथें नेमलें.

मेजर ए० ओ० सी० वॉट्‌सन् एम० बी. सी० एच्०, एफ्० आर० सी० एस, आर० ए० एम०, सी०, [ रिटायर्ड लिस्ट ] यांस पुन्हां टेंपररी सिव्हिल सर्जन करून आकोला येथें नेमण्यांत आलें आणि यानीं आपल्या कामाचा चार्ज घेतल्या म्हणजे मेजर० कॅप्टन जे० रॉबर्टसन्, आय० एम० एस० डी०, सिव्हिल सर्जन् आकोला, यांस थोड्या दिवसा करितां नागपूर येथें बदलण्यांत आलें.

रा० रा० निळकंठ गोविंद देशपांडे, तहसिलदार, एलिचपूर, यांस ता० १९ मे १९१५ पासून किंवा मिळेल त्या तारखेपासून फर्लो आणि हक्काची मिळून सात महिन्यांची रजा मिळाली आहे. आणि ते रजेवरून परत येईपर्यंत किंवा पुढें हुकूम होई पर्यंत त्यांचे जागीं रा० रा० महम्मद मैनुद्दीन, नायब तहसिलदार, यांस ऑफिशिएटिंग तहसिलदार नेमण्यांत आलें.

मुर्तिजापूर पासून कारंजापर्यंत रेल्वे फाटा सुरु आहे. कारंजा पासून दारव्हा पर्यंत लवकरच सुरु होईल.

एलिचपूर पासून चांदूर स्टेशनपर्यंत रेल्वे लाईन बांधण्यास मंजुरी मिळाल्यामुळें त्या कामास सुरवात झाली आहे.

गेल्या आठवड्यांत गायगाव नजीक रेल्वे लाइनवर डब्बे घसरल्यामुळें त्या दिवसाच्या गाड्या जाण्या येण्यास फार वेळ लागला. वरचेवर असे धोके होणें ठीक नाहीं.

## जाहीर सभा.

लढाईवर गेलेल्या लोकांच्या सोयीसाठीं लागणाऱ्या वस्तु पुरविण्यासाठीं वर्गणी गोळा करावी म्हणून आकोलें येथील श्रीराम थिएटरांत डेपुटी कमिशनर सा० यांच्या अध्यक्षतेखालीं जाहीरसभा भरणार आहे.

बेळगाव येथील ' श्रीराम तत्त्वप्रकाश ' छापखान्याचे मालक रा० आबाजी रामचंद्र सावंत यांचे कडून आलेले त्यांच्या छापखान्यांत विक्रीस तयार असलेल्या पुस्तकांचें ' १९१५ सालचें अखेर सवलतीचें नवीन लिष्ट ' आजच्या अंकासोबत पुरवणीदाखल वाटलें जात आहे त्याकडे वाचकांनीं लक्ष द्यावें.

---

## नोटीस.

मि० प्रो० कोड आर्डर ५ रूल २० प्रमाणें

### मुद्दे ठरविण्याचें समन्स.

( कानू १ व ५, आर्डर ५, एक्ट ५ सन १९०८ ई० )

दिवाणी मु० नं० ११ सन १२१५ ई०

विद्यमान सबजज्जसाहेब यांचें कोर्ट

मुक्काम दर्यापूर

वादी

मोतीसंगई रूपसंगई रा० अंजनगांव

प्रतिवादी.

तुकाराम कडताजी कुणबी रा० उमरी

दावा— कबुलायतीवरून

नांव तुकाराम

वल्द कडताजी

जात कुणबी रा० उमरीकुमरी

तहसिली दर्यापूर जि० उमरावती

ज्या पेक्षां मोतीसंगई यानें तुम्हावर शेत कबजांत मिळणें बद्दल व मालकीची रकम मिळणे बद्दल दावा केला आहे; त्या पेक्षां सदरहू दाव्याचा जबाब देण्या साठीं तारीख १२ माहे ५ सन १९१५ ई० रोजीं दिवसा १० वाजतां जातीनें किंवा ज्या कोणा प्लीडरास योग्य माहिती दिली असेल व दाव्या संबंधीं सर्व मुद्याच्या सवालाचा जबाब देण्यास जो समर्थ असेल किंवा अशा सर्व सवालाचा जबाब देऊं शकेल असा कोणी दुसरा असामी ज्याच्या बरोबर असेल अशा प्लीडराच्या मार्फत या कोर्टांत हजर होण्या विषयीं या लेखावरून तुम्हास समन्स करण्यांत येत आहे; व ज्यावरून तुमच्या जबाबास बळकटी येईल असा भरवसा बाळगण्याचा तुमचा इरादा असेल ते सर्व दस्तऐवज त्या दिवशीं हजर करण्या विषयीं तुम्हास फर्मावण्यांत येत आहे.

या पूर्वीं तुमचे वर दोन वेळां समन्से निघाली होतीं. परतु तुम्हां समन्साची बजावणी आपल्यावर होऊं देत नाहीं अशी कोर्टाची खात्री झाल्यावरून वर्तमान पत्रांतून.—

तुम्हास नोटीस देण्यांत येत आहे कीं, सदरीं लिहिलेल्या दिवशीं तुम्ही हजर न झाल्यास, तुमच्या परोक्ष दाव्याची चौकशी होऊन ठराव केला जाईल.

आज तारीख १९ माहे ४ सन १९१५ ई० रोजी आमच्या सहीनिशीं व कोर्टाच्या शिक्यानिशीं दिलें, शिक्का.

R. P. Waradpande
Sub judge
Daryapur.

नो० नं० १५७

---

## नोटीस

नोटीस देशमी सदाशिवराव बीन नानाभट, राजाराम अंबादास, व तुकाराम भटजी व देवीदास रामभाऊ व सौ० गोदाबाई जौजे सदाशिवराव सर्व रा० टुणकी महागीर ता० जळगांव यांसः—

खालीं सही करणार यांजकडून नोटीस देण्यात येते कीं, तुम्ही नामें सदाशिवराव बीन नानाभट द्वारकी इजला आईबाप नसलेमुळें तुम्हीच तिचें पालन करीत अहां व तीस एक भाऊ आहे तोही तुमचे मताप्रमाणें चालत असतो. व वरील सर्व मंडळी मिळून तुम्ही मजला द्वारकी इजला लग्नानें देण्याचें कबूल करून पंचा समक्ष ठराव करून त्याबद्दल १००० एक हजार रु० घेण्याचें ठरले होतें. व धर्मा प्रमाणे शालमुदी झाली. व मी आपणांस शालमुदी हाईपावेतों ७०० रु० दिले आहेत व बाकीचे ३०० रु० लग्नाचे दिवशीं देण्याचे ठरले होते; व आपण लग्न संबंधाची मिती वैशाख शु॥ ४ चा नेम केला होता; परंतु आतां या एकदोन दिवसांत आपण मला ती मुलगी देत नाहीं असें स्पष्ट सांगून ती दुसऱ्यासच देण्याचा विचार चालविला आहे तरी अशाप्रकारें आपण आमचे जवळून बट्टा लावून विश्वास घात करूं पाहत आहां. सबब अशा प्रकारचा विश्वास घात व धर्माचा मोड केल्याबद्दल तुमचेवर योग्य प्रकारचा कोर्टांत दावा करण्यांत येईल व ती मुलगी दुसरे कोणास दिल्यास त्याबद्दल तुम्हास जबाबदार धरले जाईल व या नोटीशीचा सर्व खर्च व पुढें होणारा सर्व खर्च आपणांकडून घेण्यात येईल कळावें.

ता० २४।४।१९१५ ई०

सही

१ नारायण सखाराम ब्राह्मण
रा० तामगाव द० खु०
ता० जळगांव जि० बुलढाणा.

नो० नं० १५८

# युरोपांतील महायुद्ध.

—:✻:✻:✻:—

## उपयुक्त व विविध माहितीचा संग्रह.

( रंगीत नकाशे व विविध चित्रें यांसह. )


सांप्रत युरोपांत जें महायुद्ध चाललें आहे, त्यासंबंधांत लागणारी सर्व प्रकारची माहिती वाचकांस एकत्र वाचावयास सांपडावी, अशा उद्देशानें हें पुस्तक तयार केलेलें आहे वर्तमानपत्रांतून प्रसिद्ध झालेल्या लढाईच्या बातम्या या पुस्तकांत घेतलेल्या नसून हल्लींच्या महायुद्धाचें ज्ञान सुलभ रीतीनें होईल अशा प्रकारची संगतवार हकीकत देऊन, शिवाय वेगवेगळ्या रणभूमीचे २ नकाशे; आणि सर्व जगाचा व युरोपांतील सर्व रणसंग्राम–भूमीचा एकत्र असे दोन रंगीत नकाशे, आणि लढाईत सामील झालेल्या राष्ट्रांच लष्करी व आरमारी सामर्थ्य दाखविणारा नकाशा, याप्रमाणें पांच नकाशे या पुस्तकास जोडले आहेत. या नकाशांत लढाईचीं मुख्य ठिकाणें, आरमारांच्या जागा, किल्ले मुख्य शहरें, नद्या, रेल्वे इत्यादि माहिती स्पष्ट करून दाखविली असून, शिवाय स्पष्टीकरणार्थ एक कोश जोडले आहेत. या कोशाच्या आधारानें लढाईतील शहरांची, बंदरांची, गावांची, त्याचप्रमाणें लढाईत भाग घेणारे थोर पुरुष आणि शस्त्रास्त्रा संबंधानें वापरण्यांत येत असलेले पारिभाषिक शब्द इत्यादि माहिती थोडक्यांत समजेल अशी योजना केली आहे. पुस्तकांतील विषयांचीं ४९ प्रकरणें केलीं असून त्यांत युरोपांतील राष्ट्रांची परिस्थिति, लढाईचीं कारणें, जर्मनी इंग्लंड, रशिया, फ्रान्स, आस्ट्रिया, सर्बिया, टर्की, बेलजम इत्यादि राष्ट्रांचा परस्परांत झालेला पत्रव्यवहार नाकेबंदीचे कायदे, व्यापाराचा प्रसार, वेगवेगळ्या राष्ट्रांच्या परिस्थितीची माहिती, लढाईशीं संबंध असलेल्या थोर पुरुषांची माहिती, आतापर्यंत लढाईत घडलेल्या गोष्टींची अनेक माहिती अशा प्रकारें विषयांची योजना करून पानापानावर चित्रेंहि घातलीं आहेत. कापडी पुठ्यांत बांधलेल्या पुस्तकाची किंमत १॥ रुपया, आणि साध्या कागदी पुठ्यांत बांधलेल्या पुस्तकाची किं. १ रु आहे. परंतु 'इंदुप्रकाश' आणि 'श्रीसयाजीविजय' या पत्रांच्या वर्गणीदारांस हें पुस्तक सन १९१६ सालची भेट म्हणून देण्यांत येतें. इंदुप्रकाश रोजचें पत्र असून त्याची वार्षिक वर्गणी टपालसह २ रु. आहे, आणि सयाजीविजय हें साप्ताहिक पत्र असून त्याची वार्षिक वर्गणी टपालसह रु. २॥ आहे. वाटेल तेव्हां नांव दाखल करून वर्गणीदार होतां येतें. नमुना अंक फुकट मिळेल.

ठाकुरद्वार, मुंबई. दामोदर सांवळाराम आणि मंडळी

---

सतत ६० वर्षांच्या पूर्ण अनुभवानें उत्तमोत्तम ठरलेला

दूषित रक्त शुद्ध करणारा




शरीराचा जीवप्राण म्हणजे शुद्ध रक्त होय. तेंच एकदां बिघडलें कीं नाना तऱ्हेचे रोग देहांत आपला शिरकाव करूं लागतात. म्हणून अशा उपदंशजन्य विकारांमुळें व तदनुषंगिक होणाऱ्या पक्षघातासारख्या रोगामुळें अर्धांग वायु, अवयव लुले पडणें, स्मरणशक्ति कमी होणें, शरीरावर गांधी उठणें, व्रण व काळे डाग पडणें, संधिवात व दूषित रक्तामुळें उद्भवणाऱ्या इतर सर्व रोगांवर डाव सार्सापरिला देणें फारच उत्तम होय, अनुभवाशिवाय गुणाची कल्पना येणार नाहीं. किंमत १ बाटलीस रु. ॥. टपालखर्च ।- पांच आणे. चार बाटल्यांस टपालखर्चासह रु. ४॥– उत्तम गुणास चार बाटल्या लागतात. आमच्या सार्सापरिल्याचा खप पाहून बऱ्याच लोकांनीं हुबेहुब नकल केली आहे, तरी घेतांना तो आमचाच आहे अशाबद्दल खात्री करून घेणें.

**मालक–** डा. मौतमराव केशव, आणि सन्स
ठाकुरद्वार पोस्टाजवळ मुंबई नंबर २

नो. नं. २३

---

सतत ४२ वर्षें चाललेला कारखाना

### ए. जे. खात्रे आणि सन् सुगंधी.

ठि:--पांजरा पोळचा नाका, चिमणलाल लखमीचंदाचें मंदीर भुलेश्वर — मुंबई.

एकच भाव! खोटो सुरमा! एकच भाव!

### आमचेकडे मिळणारा माल

ओडो सुरमा

अत्तरें – गुलाब, मोतिया, देवणा, अंबर, बकूल रुपाचा, हिना, पान, केवडा, जुई, जाफा, अंबा, हस्तंबोल, केशर, मदनबाण, पारिजातक, मुस्कहिना, गुलहिना, दवणा, केवडा, रुहस, चमेली, अगर, हीं अत्तरें दर तोळ्यास १ रुपयापासून ८ रुपयेपर्यंत निरनिराळ्या प्रतीचीं मिळतील. ३-२-४-६ रु.

तेलें.– चमेली, बेलिया, मसुर, हिना, लिंबू, हेंदी, गुलाब, मसाला, नारंगी, सुगंधलेंव, मोतिया, आवळा, नागर, कपाशी.

वरील तेलें दर रुपयास ६ तोळ्यापासून २८ तोळेपर्यंत निरनिराळ्या भावाची मिळतील, दर बाटली ४ आणे.

अगरबत्ती, अरगजा १ तोळ्यास ४ आ. ६ आ. १२ आ. १ रु. १॥ रु.पर्यंत. अरगजा व फितना ( निरनिराळ्या सुवासाचा ) दर डबीस २ आ. ४ आ. ६ आ. ८ आ. १ रु. उटणें दर डबीस १ आ. २ आ. ४ आ. ८ आ. पर्यंत. केशरी गोळी उत्तम २॥ आ. ६ आ. १० आ. १। रुपयापर्यंत. क्याटलॉग फुकट

शिवाय आसुरी, केशर, गुलाबपाणी, पत्रे, उदबत्ती, रंगीत काडें, दंतमंजन, मंजिरें, सांगव्याचे कुडिवळें, आर्यवर्धक किंमतीं विलिक, इसापिक, हस्तीदंती फण्या, कपाळ पितळी सामान, गिलटी डबे, आरसे, फण्या, सरबतें व मुरंबे, पक्वान्नें, वनस्पतींचें तेल, वातहारक आणि केश वर्धक तेलें, सुरमे व वेणीचें सामान इ. सर्व प्रकारचें वरील प्रमाणें मिळेल. त्यांच्यांत सर्व जिन्नस.

बाहेरगांवच्या गिऱ्हाईकांस माल व्हल्यूपेबलनें पाठविला जाईल. नो. नं. १

---

## Oriental Government security Life Assurance Co., Ltd

ESTABLISHED 1874.

HEAD OFFICE, BOMBAY. R. PATERSON BROWN MANAGER

THE LEADING INDIAN LIFE-ASSURANCE COMPANY

## FUNDS 4 CRORES.

INVESTITED IN GOVERNMENT SECURITIES AND MUNICIPAL AND PORT TRUST BOUNDS.

## Quinquennial Record of Progress.

| Year. | No. of Polices in force. | Existing Assurances. |
|---|---|---|
| | | Rs. |
| 1888 | 8668 | 2,63,38,000 |
| 1892 | 17,651 | 4 68,36,090 |
| 1898 | 28,516 | 6 81,27,774 |
| 1903 | 40,390 | 8 47,06,108 |
| 1908 | 52,168 | 10,12,93,883 |
| 1913 | 62 097 | 12,36,79,510 |

| Year. | Annual Income. | Total Assets. |
|---|---|---|
| | Rs. | Rs. |
| 18883 | 1148,642 | 33 38,694 |
| 189[illegible] | 21,16,549 | 80 05,818 |
| [illegible]3 | 31,36,421 | 1,40,82356 |
| 1908 | [illegible]1,67 014 | 2,10,15,947 |
| 1900 | 535,55,639 | 3,22 79 891 |
| 1913 | 99,4469 | 4,[illegible]1,61,889 |

## RECORD BONUS

*The Bonus declared for the last triennium constitutes a record.*

IMMEDIATE PAYMENT OF CLAIMS AFTER PROOF OF DEATH and TITLE. THE RATES ARE BASED ON ACTUAL INDIAN EXPERIDNCE AND ARE VERY LOW.

*Extract from report made upon the Company's position as at 31st December 1912, by Mr. Thomas WALLACE, Fellow of the institute of Actuaries, London*

"At each of the last three Valuations the Reserves of the Company have been calculated on an increasingly stringent basis. On this occasion there has been a further addition to the reserves and the financial position of the Company has been further strengthened. The resources of the Company are now so ample that the security which they afford is undoubted and Policyholders and Shareholders alike may confidently forward to a continuation of prosperity in the future."

Do not delay in applying for Insurance—delays are dangerous. The Oriental is the leading Indian Life Assurance Company. Providing the Policy holders with a absolute security and possessing all the important factors essential to a first class office it commands the full confidence of the public.

INFLUENTIAL AND ENERGETIC AGENTS WANTED. TERMS LIBERAL

Full particulars, prospectus and proposal forms on application to:—

*M. deSOUZA,*
CHIEF AGENT,
*C. P. Berar & Khandesh, Nagpur*

N. N. 25

---

हें पत्र अकोला येथें केळसवासी खंडेराव बाळाजी फडके यांच्या वऱ्हाडसमाचार छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं सदाशिवाश्रमांत छापून प्रसिद्ध केलें